म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

(सुबोध मराठी समश्लोकी गीता)



REFBK-0013508

सं. ६४

नों. क्र. ४९८९७
१७६३
नों. दि. ३०.१०.८८

॥ ॐ नमो भगवते वासुदेवाय ॥

# गीतामाई

( सुबोध मराठी समश्लोकी गीता )

चाल : भुजंगप्रयात वृत्त

REFBK-0013508

कवि

शि. वि. मराठे

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. क्रमांक ७३४०९ संग्रह शाखा स्थळप्रत
कृमांक ८९६९५ वि: काव्य
क्रमांक १५६३ नों: दि: ३१-१०-९८

मूल्य रु. दोन

प्रकाशक :

**विष्णु शिवराम मराठे**, B.A., LL.B.
पोलिस प्रॉसिक्यूटर
साळवेकर वाडा, भांगरवाडी, लोणावळा

✦ ✦ ✦

प्रथमावृत्ति : अनंत चतुर्दशी दि. ५–९–६८.

✦ ✦ ✦

सर्व हक्क प्रकाशकाचे स्वाधीन

✦ ✦ ✦

मुखपृष्ठावरील चित्र :
चित्रकार वसंत सहस्रबुद्धे
९८९ सदाशिव पेठ, फडतरे चौक, पुणें २

✦ ✦ ✦

मुखपृष्ठाची छपाई :
श्री. **सर्जेराव घोरपडे**
प्रिंटेक्स्ट प्रेस, पुणें

✦ ✦ ✦

मुद्रक :
**मु. शं. दाते**
यशवंत मुद्रणालय
१८३५ सदाशिव, पुणें २

# प्रकाशकाचें मनोगत

आमचे वडील ती. कै. शिवराम विष्णु मराठे यांनी लिहून ठेवलेल्या श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या समश्लोकी मराठी अनुवादाच्या प्रकाशनाचा संकल्प सिद्धीस नेण्याचें भाग्य लाभलें याबद्दल मला आनंद वाटतो. आपल्या आयुष्यातील अखेरच्या १०–१२ वर्षांत ते हें पुस्तक लिहीत होते. हा अनुवाद त्यांनी तिसऱ्यांदा लिहून काढला आहे. पहिला अनुवाद लिहून काढल्यावर त्यात काही सुधारणा करणें त्यांना आवश्यक वाटलें असावें; म्हणून दुसऱ्यांदा त्यांनी हें पुस्तक लिहून काढलें व त्यात पुन्हा काही सुधारणा करून हें पुस्तक जवळ जवळ संपूर्ण तिसऱ्यांदा त्यांनी लिहून काढलें होतें. काही ठिकाणी एखादा दुसरा शब्द समाधानकारक वाटत नाही, म्हणून त्यांनी जागा रिकामी सोडली होती व काही शब्दांना फुली करून ठेवली होती. याप्रमाणे आवश्यक ते फेरबदल करण्याचें त्यांचें काम चालू होतें व असें करीत असताच ते कालवश झाले. हें पुस्तक पुरें करून छापून प्रसिद्ध करावयाचें त्यांनी ठरविलें होतें. पण त्यांच्या हयातीत पुस्तक छापून प्रसिद्ध होण्याचा योग नव्हता.

आमच्या वडिलांनी ऐन तारुण्यात काही दिवस श्रीगोंदवलेकर महाराज यांच्याजवळ घालविले. महाराजांच्या बरोबर तीर्थयात्रा करण्याचें भाग्य त्यांना लाभलें होतें. त्या वेळीच हें पुस्तक लिहिण्याची प्रेरणा त्यांना मिळाली असली पाहिजे.

सदर पुस्तकास प्रस्तावना महामहोपाध्याय पूजनीय श्री. द. वा. पोतदार यांनी लिहिली हें महद्‌भाग्यच होय. त्यांना विनंती केल्यावर काहीही आढेवेढे न घेता त्यांनी प्रस्तावना लिहिण्यास संमति दिली. त्यांच्या अनेक महत्त्वाच्या व्यापात त्यांनी पुस्तकास प्रस्तावना लिहिली याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

सदर पुस्तकछपाईच्या कामी यशवंत मुद्रणालयाचे मालक श्री. ग. रा. तथा मामाराव दाते व श्री. मुकुंदराव दाते यांचें बहुमोल सहकार्य लाभलें. तसेंच प्रिंटेक्स्ट प्रेसचे मालक श्री. सर्जेराव घोरपडे यांनी मुखपृष्ठ छापण्याचें काम आत्मीयतेने केलें आहे.

श्रीमत् भगवंताचे चरणी ही अल्प सेवा रुजू केली आहे. जनताजनार्दनाने ही सेवा गोड मानून घ्यावी.

अनंत चतुर्दशी<br>
दि. ५–९–१९६८

त्रि. शि. मराठे

# प्रस्तावना

'गीतामाई' या नावाने श्री. शि. वि. मराठे यांनी केलेला भगवद्गीतेचा समश्लोकी अनुवाद प्रस्तुत पुस्तकात ग्रथित आहे. वामनपंडितांची समश्लोकी सर्व-प्रसिद्ध आहे. तरीही श्री. मराठे यांनी हौसेने ही समश्लोकी रचली. ती मी जसजशी पाहात गेलो, तसतसे माझ्या ध्यानात आलें की, श्री. मराठे हे पट्टीचे आणि सराईत पद्यकार नसले तरीही गीतेसारख्या तत्त्व-ज्ञानात्मक ग्रंथाचा त्यांनी केलेला समश्लोकी पद्यानु-वाद सोपा आणि सरळ असा उतरला आहे. गीतेचें श्रद्धापूर्वक मनन मराठे यांनी केल्याची साक्ष त्यांची ही समश्लोकी देईल. ज्यांना मूळची संस्कृत गीता समजण्यास जड जाते, त्यांना असे सोपे अनुवाद पुष्कळच साहाय्यक होतात. मोठमोठ्या टीका आणि भाष्यें यांच्या अरण्यात शिरून अर्थाची शिकार साधा-रण प्रापंचिकाला साधणें कठीण. म्हणून वामनांच्या जोडीला, मराठे यांचा अनुवादही अशा मंडळींना उपयोगी पडेल. हा अनुवाद अगदी वरवरचा वाटला नाही. विषयाचें मर्म आणि आशय सोप्या शब्दांत उतरण्याचा तो यशस्वी प्रयत्न आहे.

गीतानुवाद मराठीत पुष्कळच आहेत. त्या सर्वांत श्री. विनोबांची 'गीताई' एक देणगी वाटावी इतकी अप्रतिम आहे. आणि म्हणून तिच्या लक्षावधि प्रती महाराष्ट्रात पसरल्या आहेत.

महाराष्ट्राला गीतेविषयी वाटणारा हा जिव्हाळा हा महाराष्ट्राचाच एक व्यवच्छेदक असा विषय आहे असें अलीकडे कित्येक वर्षांपासून माझ्या ध्यानात आलें आहे. ज्ञानदेवांची 'ज्ञानदेवी' हिला तर जगाच्या वाङमयात तोड नाही! तरी मराठी स्वभावाचें समाधान झालें नाही म्हणून वामन पंडितांनी यथार्थदीपिका रचली. तीही सोपी आणि भक्तितत्त्वांचा परिपोष करणारी आहे. आपल्या प्राचंड्याने हिमालयाएवढा उंच वाटणारा दासोपंतांचा 'गीतार्णव' हाही मराठी वाङमयातील एक चमत्कार आहे. पंतांनी सोप्या भाषेत कठीण शास्त्रार्थ विवरिले आहेत. निरंजन, रघुनाथ वगैरेंच्याही वाचनीय टीका आपणांस उपलब्ध आहेत. इतकें समृद्ध गीतावाङमय पांच सहाशेच्या काळात रचलें गेलें आहे. प्रो. भानू, भाऊशास्त्री लेले आणि विष्णुशास्त्री बापट यांनी मराठी गद्यात केलेले, सटीप भाष्यानुवाद प्रसिद्ध झालेले आहेत. असें असताही लो. टिळक यांनी कित्येक तपांच्या अध्ययनानंतर आपलें गीतारहस्य प्रसिद्ध केलें आहे.

विनोबांचीं गीताप्रवचनें, त्यांच्या प्रतिभेची द्योतक आहेत. पं. सातवळेकरांनी आपली पुरुषार्थी भाष्य असलेली गीता प्रसिद्ध केली आहे. जागजागी गीतामंडळें, गीताभवनें, गीतापठणस्पर्धा वगैरे चालू आहेत.

माझ्या लक्षात असें आलें की, असा अविच्छिन्न गीतेचा ध्यास आणि अभ्यास शतकानुशतकें भारताच्या दुसऱ्या कोणत्याही भागात परंपरेने चालत आलेला नाही. अलीकडच्या शेदोडशे, शेदोनशे वर्षांची गोष्ट सोडून द्या, मी पांच सातशे वर्षांच्या भव्य परंपरेची गोष्ट बोलत आहे. एरवी गीता ही महाभारतातील एक भाग असल्यामुळे आणि तीवर मोठमोठ्या आचार्यांचीं भाष्यें असल्यामुळे संस्कृत पंडितांत गीतेचें अध्ययन होत आलें आहे. महाराष्ट्रात मात्र, पंडितांच्या बरोबरच जनसामान्यांकरिता मऱ्हाटी भाषेत गीतार्थ फैलावण्याचें कार्य वर दर्शविल्याप्रमाणे अखंड चालू आहे. महाराष्ट्रीय लोकांच्या मनाची घडण काहीशी चिकित्सक बनलेली दिसते, तिचें बीज या गीताप्रेमात आहे. महाराष्ट्रीय मनाच्या निराळेपणाची आणि स्वतंत्र बाण्याची खूण या विचाराने स्पष्ट दिसून येईल.

ज्ञानदेवांनी जरी ज्ञानेश्वरी टीका लिहिली, तरी केवळ आपलें तत्त्वज्ञान सांगणारा अमृतानुभव स्वतंत्र रचला. एकनाथांचे चित्सुख वगैरे ग्रंथ आहेतच. श्रीसमर्थांचा दासबोध हा प्रभावी ग्रंथ असाच स्वतंत्र आहे. शेख महंमदाचा योगसंग्राम "शब्द जसा कमानीचा तीर" अशा डौलाने लिहिलेला आहे. 'जयबोध' वगैरे आणखी ग्रंथ आहेत. म्हणजे मराठीत निव्वळ गीताभाष्य नाही, तर तत्त्वज्ञानाचे स्वतंत्र ग्रंथ आहेत. असा भक्कम दुहेरी तात्त्विक पाया मराठीला लाभलेला आहे. असली ऊर्मि हीच गीतामाईकर्त्या श्री. मराठे प्रभृतींच्या प्रयत्नाचें मूळ आहे. म्हणून मी श्री. मराठे यांच्या गीतामाईचें सकौतुक स्वागत करीत आहे.

पुणें
सौर १६ भाद्रपद १८९०

**दत्तो वामन पोतदार**

# कवि : शि. वि. मराठे



व्यवसाय : ड्रॉईंग टीचर, बुधगाव हायस्कूल, बुधगाव

जन्म
दि. १९–६–१८८५

निर्याण दिन
दि. १६–९–१९६४

# गीतामाई महिमा

इथे श्रीगुरू हे हृषीकेष झाले ।
तसा पार्थ हा शिष्य होऊन बोले ॥
प्रभो मी भ्रमे फार मोहून गेलो ।
करी बोध देवा हिताला भुकेलो ॥ १ ॥
अशी भूमिका श्रीऋषी व्यास घेती ।
पुढे सर्व गीता जगा सांगताती ॥
जिने कर्म नी ज्ञान भक्ती कराया ।
प्रभावी असा बोध केला जना या ॥ २ ॥
जिला पांचवा वेदही बोलताती ।
ऋषी संत साधू जिला मान देती ॥
तशी ही जगा पूज्य होऊन राही ।
स्मरावी असें नित्य वाटे कुणाही ॥ ३ ॥
प्रसादे जिच्या होतसे मोहनाश ।
तसाची भवाच्या भयांचा विनाश ॥
तसे षड् रिपू दुष्ट हे दूर जाती ।
तशीं पातकें हीं पुरीं नष्ट होतीं ॥ ४ ॥
कृपेने जिच्या वाढते ईशभक्ती ।
तशी वीषयातून होते विरक्ती ॥
जिने मी असे कोण हें जाणवीलें ।
प्रभूचे परंधामही दाखवीलें ॥ ५ ॥

अशी थोर गीता मला माय झाली ।
कृपेने जिच्या मन्मना जाग आली ॥
सदोदीत अभ्यास वाटे करावा ।
तरी साह्य व्हावें मला देवदेवा ॥ ६ ॥

कै. मातुःश्री

ती. सौ. लक्ष्मीबाई मराठे

यांना सादर समर्पण

— वि. शि. मराठे

## अध्याय पहिला

# अर्जुनविषादयोग

महालय
७३४०८

धृतराष्ट्र म्हणाला

कुरुक्षेत्र ही पुण्यभूमी असूनी ।
तिथे आमच्या पांडुच्याही मुलांनी ।।
जमूनी पहा सर्व युद्धास आले ।
तयांनी पुढे संजया काय केलें ।। १ ।।

संजय म्हणाला

उभी केलि सेना तिथे पांडवांनी ।
तिला सज्ज दुर्योधनाने बघूनी ।।
पुढे आपल्या तो गुरूपाशि गेला ।
तिथे जाऊनी त्यास ऐसे म्हणाला ।। २ ।।

गुरुजी बघा ही असे पांडुसेना ।
रची आपला बुद्धिमान् शिष्य राणा ।।
तिला याज्ञसेनें पुरेशी रचीली ।
रचूनी असा व्यूह ती सिद्ध केली ।। ३ ।।

इथे यांत भीमार्जुनासारखे ते ।
धनुर्धारि मोठे तसे शूर नेते ।।
तसाची विराटेश आणि प्रधान ।
महाथोर तो सात्यकीही सुजाण ।। ४ ।।

तसा कुंतिभोजा पुरूजीत जाणा ।
तसा शैब्य तोही पुढारी शहाणा ।।
तसा धृष्टकेतु तसा चेकितान ।
तसा काशिराजा असे वीर्यवान ।। ५ ।।

युधामन्यु तोही महाशूर वीर ।
तसा उत्तमौजा असे तोही थोर ।।
तसे द्रौपदीपुत्र सौभद्रही ते ।
तसे तेहि जाणा रथीही भले ते ।। ६ ।।

तसे सैन्य आता पहा आमचेंही ।
तयांतील जे अग्रणी श्रेष्ठ तेही ।।
पुरेसें कळायास त्यांचींहि नावें ।
पहा सांगतो तेंही ऐकून घ्यावें ।। ७ ।।

महा थोर ते भीष्म आणीक तुम्ही ।
कृपाचार्य तैसाच तो कर्ण नामी ।।
पहा आपला पुत्र आणी विकर्ण ।
तसा सोमदत्ती यशस्वी असून ।। ८ ।।

असे सर्व हे वीर माझ्याच कार्या ।
पुरे सज्ज होऊनि आले लढाया ।।
सजूनी तसे शस्त्र अस्त्रानिशी ते ।
प्रभावी असे आज आले पहा ते ।। ९ ।।

अमर्याद हें आमचें सैन्य होई ।
तया थोरले भीष्म हे राखतीही ॥
समर्याद ते पांडवांचेच झाले ।
तरी भीमसेने तया राखियेले ॥ १० ॥

प्रवेशास हे द्वार या अग्रभागी ।
असू दे तसे नेमिले त्याच जागी ॥
तुम्ही सर्व भीष्मास सांभाळ द्यावा ।
तसा जोर चोहीकडूनी करावा ॥ ११ ॥

सुयोधास संतोषवाया म्हणूनी ।
प्रतापी कुरूवृद्ध पीतामहांनी ॥
तदा शंख फुंकूनिया जोर केला ।
तसा सिंहनादे बहू गाजवीला ॥ १२ ॥

तसेचीहि सर्वत्र ते शंखभेरी ।
मृदंगे नगारे नि शिंगे तुतारी ॥
अकस्मात त्यांचा महानाद झाला ।
अती घोर सर्वत्र तुंबून गेला ॥ १३ ॥

तदा शुभ्र अश्वास ज्या जुंपलेले ।
अशा भव्यशाही रथी बैसलेले ॥
तिथे माधवें पांडवें काय केलें ।
रणी दिव्य ते शंख की फुंकियेले ॥ १४ ॥

तदा पांचजन्यास त्या माधवाने ।
तसें देवदत्तास त्या अर्जुनाने ॥
तसा पौंड्र भीमे बहू गाजवीला ।
तयाने महा घोर आवाज झाला ॥ १५ ॥

युधिष्ठीर ही वाजवी त्या अनंता[1] ।
अती थोर आवाज झाला पहाता ॥
तसे शूर माद्रीसुतांनी धरीले ।
सुघोषा मणीपुष्पका वाजवीले ॥ १६ ॥

तसा काशिराजा धनुर्धारिही तो ।
तसाची रथी तो शिखंडी पहा तो ॥
तसा सात्यकीही अती शूर जाणा ।
तसे तेथ पाहे विराटादिकांना ॥ १७ ॥

तसा तो अभीमन्यु मोठा रथीही ।
तसे द्रौपदीचे पहा पुत्र तेही ॥
महाथोर ते वीर एकत्र आले ।
तदा शंख नादे बहू दिव्य केले ॥ १८ ॥

कुरूपुत्रछातीच झाली विदीर्ण ।
तया नादघोषेंच गेली भरून ॥
असे स्वर्ग पाताळ तुंबून गेले ।
तसे दिव्य मोठे महाघोर झाले ॥ १९ ॥

---

१ अनंता नावाचा शंख

व्यवस्थींत तेव्हा कुरूपुत्र सारे ।
उभे राहूनी ते पुन्हा नीट झाले ।।
उभारूनि शस्त्रें पुढे चालणार ।
तया वेळिही पार्थ झाला तयार ।। २० ।।

अर्जुन म्हणाला

धनुष्यास घेऊनिया सिद्ध झाला ।
तदा कृष्णदेवा असे बोलियेला ।।
रथाला पुढे घेउनीया चलावें ।
तिथे दोन्ही सैन्यामधे त्यास घ्यावें ।। २१ ।।

महावीर युद्धा किती कोण आले ।
मला एकदा पाहू दे आज सारे ।।
मला जोड होतो कसा झुंज देतो ।
असे कोण ते सर्व त्यांना पहातो ।। २२ ।।

महा दुष्ट दुर्योधनासी भुकेले ।
तयाचें करायास कल्याण आले ।।
अशा सर्व वीरांस पाहून घेतो ।
कसे झुंज देणार तें मी पहातो ।। २३ ।।

संजय म्हणाला

जयावेळि अर्जून ऐसे म्हणाला ।
तयावेळि श्रीकृष्णही सिद्ध झाला ।।
पुढे दोन्ही सैन्यामधे त्या रथासी ।
उभें सज्ज केलें तया उत्तमासी ।। २४ ।।

तिथे भीष्म सेना नि द्रोणादिकांना ।
तसे सर्व राजे नि साऱ्या जनांना ।।
असे पाहुनी तो म्हणे अर्जुनासी ।
पहा नीट तूही कुरूच्या जनासी ।। २५ ।।

तिथे अर्जुनाने उभे राहिलेले ।
पिते आणि आजेहि ते देखियेले ।।
गुरू आणि मामे मुलें आणि नातू ।
तसेची पहा ते सखे आणि भ्रातू ।। २६ ।।

तिथे सासरे सोयरेही बहूती ।
तसे दोन्हि सैन्यामधे दीसताती ।।
असे सर्वही सैन्य जे सज्ज झाले ।
तदा अर्जुनाने तया देखियेले ।। २७ ।।

अर्जुन म्हणाला

अशा वेळि कारुण्य भावे तयाला ।
अती दुःख होऊनिया बोलियेला ।।
पहा लोक हे आमचे सर्व होती ।
कसे युद्ध उत्सूक होऊ पहाती ।। २८ ।।

अती सूकले तोंड माझें दयाळा ।
तशी सर्व गात्रेहि होतात गोळा ।।
बहू कंप माझ्या शरीरात होतो ।
पहा हा कसा अंगि रोमांच येतो ।। २९ ।।

न राहेच गांडीव हाती मुळीही ।
जळू लागली जाण माझी त्वचाही ॥
मला काहि देवा उभे राहवेना ।
मनाला तसेचीहि स्थीरत्व येना ॥ ३० ॥

मला केशवा हें दिसे वीपरीत।
तशी लक्षणें चांगलीही नव्हेत ॥
तसें युद्धि कल्याण काही दिसेना।
बघूनी अशा आपल्या या जनांना ॥ ३१ ॥

नको रे जयाते नको राज्य माते ।
मधूसूदना रे नको त्या सुखाते ॥
कशाला हवे राज्य ते भोग घ्याया ।
जगावें कशाला तरी मी जगी या ॥ ३२ ॥

जया कारणे ही अपेक्षा करावी ।
जयासाठि राज्यें सुखे मीळवावी ॥
तयांनी धनी आणि प्राणा त्यजाया ।
इथे काय यावें तयांनी लढाया ॥ ३३ ॥

गुरु आणि मामे तसे मेहुणेही ।
तसेची पहा पुत्र नी आप्त तेही ॥
पिते आणि आजे सखे दीसताती ।
तसे सासरे नातवंडे बहूती ॥ ३४ ॥

मला केशवा हे जरी मारतील ।
तरी ना कदापी तया मारणार ॥
तिन्ही लोकिचें राज्य देवा नको तें ।
तिथे ही कथा पृथ्वीची काय माते ॥ ३५ ॥

रणी कौरवासी जरी नाश केलें ।
तरी आमचें कोणतें हीत झाले ॥
जरी आततायी अजी दीसती हे ।
तरी मारुनी यासही पाप आहे ॥ ३६ ॥

तरी घात यांचा कशासी करावा ।
मुळी योग्य होणार नाहीच देवा ॥
असा आपल्यांचा कसा प्राण घ्यावा ।
तयाने कसे सौख्य होणार जीवा ॥ ३७ ॥

बहू दोष होती कुलाच्या क्षयात ।
तसे मित्र वैरात ही पाप होत ॥
तयांची कशी बुद्धिही अंध झाली ।
अती लोभ होऊन भ्रष्टून गेली ॥ ३८ ॥

कुलाच्या क्षयाने महा दोष होती ।
तसे स्पष्ट आम्हांस ते दीसताती ॥
खरे तेच आम्हांस का ना कळावें ।
नको वैर आम्हा मनी का न यावें ॥ ३९ ॥

कुलाचार तैसेच हे धर्म नीती ।
कुलाच्या क्षयानेच ते नाश होती ।।
कुळामाजि होता जरी धर्मनाश ।
तसा तेथ वाढे दुराचार पाश ।। ४० ।।

पुढे त्या अधर्मी बहू वाढ होई ।
कुळांतून त्या भ्रष्ट होती स्त्रियाही ।।
स्त्रिया भ्रष्ट झाल्यावरी काय होई ।
पुढे मिश्रसंतान होऊनि राही ।। ४१ ।।

पुढे संकटी जाण सारी कुळें तीं ।
कुलघ्नास घेऊन नर्कास जाती ।।
तसे पूर्वजांचे अधःपात होती ।
विनाशामुळे सर्व लोपून जाती ।। ४२ ।।

कुलघ्नाचिया याच दोषामुळे तो ।
पुढे भ्रष्ट आचार होऊन जातो ।।
रहाव्या जगी या कशा सर्व ज्ञाती ।
कुळाचार नी धर्मही बूडताती ।। ४३ ।।

जयांच्यामुळे सर्व हे धर्म गेलें ।
जयानी पहा या कुळा नाश केले ।।
तया लागि निश्चीत हा नर्कवास ।
असें ऐकिलें अस्म्हिः हे जाण खास ।। ४४ ।।

असा लोभ राज्या सुखाचाहि केला ।
तयाने पहा आपला घात झाला ।।
कसे सिद्ध झालो सखे मारण्याते ।
अरेरे कसे पाप आरंभिलें तें ।। ४५।।

तरी स्वस्थ आता रणी मी राहातो ।
प्रतीकार शस्त्रेंहि टाकून देतो ।।
परी हे मला का जरी मारतील ।
तरी तेचि भारी हिताचें ठरेल ।। ४६ ।।

संजय म्हणाला

असे जाण अर्जुन तो बोलियेला ।
तसा दुःख शोके अती खिन्न झाला ।।
धनुष्यास बाणास टाकून देई ।
तसाची पहा स्वस्थ बेसूनी राही ।। ४७ ।।

* * *

इति श्रीप्रभू पार्थ संवाद थोर ।
इथे पार्थ दुःखी जहाला अपार ।।
असा एक अध्याय संपूर्ण झाला ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीला ।।

## अध्याय दुसरा

# सांख्ययोग

संजय म्हणाला

असा पार्थ कारुण्यतेने गळाला ।
बहू घाबरा आणि दुःखीहि झाला ।।
अशा अर्जूना जेधवा देखियेले ।
तया वेळि श्रीकृष्ण ऐसे म्हणाले ।। १ ।।

श्रीभगवान म्हणाले

तुला हा असा मोह कोठून झाला ।
नसे आर्य लोकास हा शोभणारा ।।
अशी आपदांची अवेळा असूनी ।
कुबुद्धि तुझे मानसी ये कुठोनी ।। २ ।।

असा भ्याड होऊ नको पार्थ राया ।
तुला योग्य नाही असे खिन्न व्हाया ।।
अशी क्षुद्र वृत्ती नि नामर्दताही ।
पुरी सोडुनी ऊठ देई लढाई ।। ३ ।।

अर्जुन म्हणाला

पहा हे गुरु द्रोण नि भीष्म आजे ।
असे वंद्य ते देवराया मला जे ।।
तयांच्या सवे युद्ध कैसे करावें ।
तया बाण मारूनी कैसे वधावें ।। ४ ।।

गुरुजीस देवा वधाया न जाता ।
बरी होय भिक्षा खरेची पहाता ।।
वधूनी हितेच्छू जना भोग येती ।
तरी तेहि रक्ताळलेले रहाती ।। ५ ।।

तसेची जयासी कुणी मीळवावे ।
कळेना कुणाचे कसें हीत व्हावे ।।
जगावे न वाटे जया मारूनीया ।
पुढे ते उभेची लढाई कराया ।। ६ ।।

प्रभो दैन्यदोषे प्रवृत्ति उडाली ।
पडे मोह धर्मात बुद्धिहि गेली ।।
तुझा शिष्य झालो हिताला भुकेलो ।
करी बोध देवा पदी लीन झालो ।। ७ ।।

जरी देव लोकी मिळाले प्रभुत्व ।
जरी पृथ्विचे येतसे राज्य सर्व ।।
तरी शोक हा ताप दे इंद्रियांना ।
कसा नष्ट होईल काही कळेना ।। ८ ।।

महावीर योद्धा जरी पार्थ झाला ।
तरी केशवासी असे बोलियेला ।।
प्रभो मी लढाईच देणार नाही ।
असे बोलुनी तो पहा स्तब्ध राही ।। ९ ।।

असे पाहुनी दोन्हि सैन्यात जाण ।
गुडाकेश दुःखी असे ते बघून ॥
तदा चक्रपाणी रणी अर्जुनाला ।
जणू हासुनी तो असे बोलियेला ॥ १० ॥

श्रीभगवान म्हणाले

अरे शोक तू हा फुकाचा करीशी ।
वरी ज्ञानही ते मला सांगतोसी ॥
जिताचा मृताचा असा दैन्यवाणा ।
वृथा शोक ज्ञानी कदापी करीना ॥ ११ ॥

जसे सर्व राजे नि तू मीहि सारे ।
असे सर्व पूर्वीहि होतो सख्यारे ॥
तसेची भविष्यात ही राहणार ।
असा व्याप हा सारखा चालणार ॥ १२ ॥

जसे बाल्य तारुण्य वृद्धत्वही ते ।
असे सर्व जीवांस देहांत होते ॥
नवा देह तैसा पुन्हा प्राप्त होई ।
म्हणोनी विचारी न मोहे कदाही ॥ १३ ॥

तसेची विकारात संयोग येती ।
तिथे दुःख नी सूख हे भोग होती ॥
तया जन्म नी नाश आहे स्वभावे ।
म्हणोनीच तू त्यास सोशीत जावे ॥ १४ ॥

अशी दुःख सुखे जया सारखीची ।
जया लागी पीडा न होई तयाची ।।
असा जो असे ज्ञानी तो पार्थ राया ।
खरा योग्य तो होय मोक्षास जाया ।। १५ ।।

असे सत्य ते मिथ्य होणार नाही ।
तसे मिथ्य ते सत्य नाही कधीही ।।
असा शोध हा दोहिचाही करुनी ।
निवाडा असा लाविला ज्ञानियानी ।। १६ ।।

जयाने जगासी सदा व्यापियेले ।
अवीनाश हें तत्व त्या बोलियेले ।।
अशा नित्य तत्वास बा नाश कोणी ।
करूची शकेना पहा पुण्यखाणी ।। १७ ।।

तसा देह केव्हाहि हा नाश पावे ।
धनी अव्ययी जाण आत्माच आहे ।।
अशा अव्ययासी कधी नाश नाही ।
म्हणूनीच तू ऊठ देई लढाई ।। १८ ।।

म्हणे एक आत्माच मारे स्वताहा ।
कुणासी गमे की दुज्या मारितो हा ।।
खरे ज्ञान दोघा मुळी आकळेना ।
न मारे कुणा तो नि तोही मरेना ।। १९ ।।

जसा जन्म नी मृत्यु आत्म्यास नाही ।
तसा जन्म त्यासी न मागे पुढे ही ।।
जरी अव्ययी हा जरी देह नाश ।
तसा नित्य तोची पुराणा पुरुष ।। २० ।।

जसा हा अजन्म तसा हा अनत ।
असे तत्वता जे पुरे जाणतात ।।
तरी ते तयासी कसे मारतील ।
तसे मारवीणे कसे इच्छितील ।। २१ ।।

जशी लोक वस्त्रें जुनी सोडताती ।
तशी ते नवी अन्य पाहून घेती ।।
तसा हा जीवात्मा जुना देह सोडी ।
तसाची पुन्हा तो नवा देह जोडी ।। २२ ।।

पहा शस्त्र योगे जिवात्मा तुटेना ।
तसा अग्निही त्यास जाळू शकेना ।।
तसे पाणिही त्या कदा भीजवीना ।
तसा वायु हाही तया सूकवीना ।। २३ ।।

जसा तो तुटेना तसा तो जळेना ।
तसाची पहातो भिजेना सुकेना ।।
असा नित्य नी स्थीर व्यापी जगासी ।
पुराणा असूनीहि ना अंत त्यासी ।। २४ ।।

नसे चिंत्य पाही नि अव्यक्त राही ।
तसा निर्विकारी असे बोलतीही ॥
अशा आत्मतत्वास जाणून घ्यावे ।
पुढे शोक दुःखास सोडून द्यावे ॥ २५ ॥

जरी जन्म आत्म्यास तू मानशील ।
जरी मृत्युही त्या असे कल्पिशील ॥
असे मानलेसी जरी तू तयासी ।
तरी शोक ना योग्य बा पुण्यराशी ॥ २६ ॥

तयासी जरी जन्म नी मृत्यु आहे ।
तरी त्या मृता जन्म निश्चीत राहे ॥
म्हणूनी टळेना अशा गोष्टीला या ।
नसे योग्य तो शोक बा पार्थराया ॥ २७ ॥

असे भूत मात्रास अव्यक्त मूळ ।
परी व्यक्त होती मधे अल्पकाळ ॥
पुन्हा शेवटी होत अव्यक्त जाण ।
तरी त्या मधे शोक तो का म्हणून ॥ २८ ॥

कुणी यास आश्चर्यसे बोलताती ।
कुणी यास आश्चर्यसे ऐकताती ॥
कुणी यास आश्चर्य ऐसे पहाती ।
परीही कुणी यास ना जाणताती ॥ २९ ॥

तसा सर्व देहांत हाची रहातो ।
नसे वध्यही तो तसा नित्यही तो ।।
म्हणूनी कधीही कुणासाठि वाया ।
नसे योग्य तो शोक बा पार्थराया ।। ३० ।।

स्वधर्माकडे तू जरी पाहिलेसी ।
तरी ही तुला भीरुता योग्य कैसी ।।
दुजे धर्म युद्धाहुनी पार्थराया ।
नसे क्षत्रियासी भले आचराया ।। ३१ ।।

प्रयत्नेविना हें तुला प्राप्त झालें ।
खुलें स्वर्गिचें दार राया मिळालें ।।
असे युद्ध हे क्षत्रिया भाग्य जाण ।
अती लाभदायी असे पूर्ण मान ।। ३२ ।।

अशा धर्मयुद्धा जरी टाळशील ।
तरी पाप निःसंशये पावशील ।।
स्वधर्मास तैसेच कीर्तीस राया ।
अरे अंतरीसी दुरी सारूनीया ।। ३३ ।।

जगी लोक सारे तुला निंदितील ।
सदा तेच दुष्कीर्ति ही बोलतील ।।
अशी सज्जना लागि दुष्कीर्ति जाण ।
सदा दुःखदा वाटते मृत्यूहून ।। ३४ ।।

तुला वीर योद्धे बहू निंदितील ।
भिऊनी पळाला असे मानतील ॥
तुला ते जरी थोर मानीत होते ।
तरी ते पुढे लेखती तुच्छ तूते ॥ ३५ ॥

तुला जाण भाषाहि अवाच्य फार ।
रिपू जे तुझे ते सदा बोलतील ॥
तुझ्या जाण शौर्यासिही निंदतील ।
तया कारणे दुःख तू पावशील ॥ ३६ ॥

जरी युद्धि मेलास लाभेल स्वर्ग ।
यशस्वी जहाल्यास राज्योपभोग ॥
म्हणूनीच युद्धास तूं सिद्ध व्हावें ।
तसेची पहा निश्चयाने लढावें ॥ ३७ ॥

जशी दुःख सूखे तशी लाभ हानी ।
तसे हार जीतास मानी समानी ॥
असे जाणूनी होई युद्धा तयार ।
तरी पाप नाही तुला लागणार ॥ ३८ ॥

तुला बोलिलो मी वरी सांख्य मार्ग ।
तसा घेई अैकून हा बुद्धि योग ॥
तरी त्यामुळे ज्ञान तेही मिळेल ।
तसा कर्म बंधातुनी सूटशील ॥ ३९ ॥

चुकीचे असे यात काही घडेना ।
सुरू जाहले कार्य तेही बुडेना ॥
असा धर्म थोडा जरी जोड देई ।
तरी तो भयातूनि तारूनि नेई ॥ ४० ॥

तसा लाभही निश्चयाचा मिळेल ।
तशी बुद्धि अेकाग्रता मेळवील ॥
अशी बुद्धि एकाग्र ज्यांची दिसेना ।
तयांच्या मधे फूटफाटेच नाना ॥ ४१ ॥

पहा वेद वाक्यार्थ ते रंगवूनी ।
बहू रंगताती पुढे त्या मधूनी ॥
चुकीचाच हे मुढ वेदार्थ घेती ।
दुजे काहि नाही असे बोलताती ॥ ४२ ॥

मिळे जन्म ऐशीच कर्मे करावी ।
फळे गोडशी तेथ भोगूनी घ्यावी ॥
अशी स्वर्ग सूखेच्छु कर्मेच गाती ।
पुन्हा भोग ऐश्वर्यची सांगताती ॥ ४३ ॥

तयांची अशी बुद्धि मोहून जाते ।
सदा भोग ऐश्वर्य आसक्त होते ॥
तिला निश्चयाचा नव्हे लाभ काही ।
तसे अंतरी स्थैर्य नाही कधीही ॥ ४४ ॥

जरी वेद बोले त्रिगूणी रहावें ।
तरी तूं तयासी अलिप्ते असावें ।।
सुखासूख सोडून हो आत्मवान ।
रहा नित्य सत्त्वस्थ निश्चित पूर्ण ।। ४५ ।।

जिथे चारि बाजूस पाणीच पाणी ।
तिथेची विहीरीस जाई न कोणी ।।
तसा ब्रह्मज्ञानी सुखाने रहातो ।
कशासाठि वेदाकडे तो पहातो ।। ४६ ।।

धरूनी फलाशेस कर्में नसावीं ।
अकर्मांत इच्छा कधी ना धरावी ।।
तुला फक्त कर्मी अधीकार आहे ।
फलांच्या वरी तू कधीही न राहे ।। ४७ ।।

सदा योगयुक्ते असे कर्म व्हावें ।
समा बुद्धिसी योग ऐसें म्हणावें ।।
अनासक्त होऊन कर्में करावीं ।
अपेक्षा यशा सारखी बुद्धी ठेवी ।। ४८ ।।

समानत्व बुद्धी असे सर्व श्रेष्ठ ।
तिच्याहून हें कर्म मानी कनिष्ठ ।।
तरी आसरा बुद्धियोगात घेई ।
फलांची अपेक्षा करीही न तोही ।। ४९ ।।

तसे पाप नी पुण्य दोन्ही फलाते ।
करी स्थीर बुद्धी पुरा त्याग त्याते ।।
तसा योग तो कर्मि कौशल्य जाण ।
असा योग साधून घेई म्हणून ।। ५० ।।

समानत्व बुद्धी शहाणे धरीती ।
फलाशाहि कर्मात सोडून देती ।।
तरी तेच बंधातुनी मुक्त जाण ।
परंधाम ते मेळवीती म्हणून ।। ५१ ।।

तुझी बुद्धि ज्या वेळी मोहातुनी या ।
पुरी पार होईल ती पार्थराया ।।
जुन्या नी नव्या ऐकिल्या वीषयाते ।
पुरे होइ वैराग्य तेव्हा तुला ते ।। ५२ ।।

श्रुती वेदही जाण ऐकून कानी ।
तुझी बुद्धि गेली असे ती भ्रमूनी ।।
स्थिरावेल संदेह जै टाकुनीया ।
स्थितप्रज्ञता तै मिळे पार्थराया ।। ५३ ।।

अर्जुन म्हणाला

स्थित प्रज्ञ देवा कुणासी म्हणावे ।
तया आत्मनिष्ठा कसें ओळखावे ।।
कसा वागतो तो कसा चालतो तो ।
कसा बोलतो नी कसा तो रहातो ।। ५४ ।।

श्री भगवान म्हणाले

मुळी वासना सर्व सोडून देतो ।
तसा अंतरामाजिही स्थीर होतो ।।
स्वये स्वस्वरूपात संतुष्ट राही ।
तयासी स्थितप्रज्ञ हे नांव येई ।। ५५ ।।

दुःखात ज्याला कधी खेद नाही ।
तसाची सुखासक्त नाही कधीही ।।
भय क्रोध प्रीतीतुनी जो विमुक्त ।
स्थितप्रज्ञ ऐसे तया नांव सार्थ ।। ५६ ।।

शुभाशूभ गोष्टी असो दे कशाही ।
न मानी निरूत्साह उत्साह तोही ।।
अनासक्त सर्वत्र जो राहताहे ।
तयासी स्थितप्रज्ञ हे नांव राहे ।। ५७ ।।

जसा कूर्म हा आपल्या इंद्रियांना ।
पुरे आवरूनीहि घेई तयांना ।।
तसा योगि जो वासनी राहताहे ।
तयाचीच बुद्धी सदा स्थीर राहे ।। ५८ ।।

निराहार मार्गे जरी हो विरक्ती ।
तरी वासनांची मुळे राहताती ।।
प्रचीतीस जेव्हा परब्रह्म येते ।
मुळांचेहि तेव्हा पुरे भस्म होते ।। ५९ ।।

जरी ज्ञानवेत्ता करी यत्न सारा ।
तरी जाण पार्था तयाच्या मनाला ।।
पुरे खेचुनी घेति जोरा करूनी ।
अशी इंद्रियेही महाघोर मानी ।। ६० ।।

तयासी बहू युक्तिने रोधुनीया ।
तसेची अनन्ये मला चिंतुनीया ।।
अशी इंद्रिये कोणि जिंकून घेई ।
तयाचीच बुद्धी पुरी स्थीर होई ।। ६१ ।।

सदा वीषयी ध्यान ज्यांचे रहाते ।
तयांच्यात आसक्ति उत्पन्न होते ।।
पुढे त्यातची काम जन्मास येतो ।
पुढे क्रोध कामात निर्माण होतो ।। ६२ ।।

पुढे जन्म क्रोधात संमोह घेई ।
स्मृति भ्रंश होण्यास संमोह पाही ।।
स्मृति भ्रंश योगामुळे बुद्धि नाश ।
पुढे बुद्धि नाशात सारे खलास ।। ६३ ।।

परंतु जया द्वेष प्रीती असेना ।
तसे ठेवी स्वाधीन जो इंद्रियाना ।।
तसे वीषया माजि स्वामित्व ज्याचे ।
सदा चित्त संतुष्ट राही तयाचे ।। ६४ ।।

जयांचे सदा चित्त संतुष्ट राही ।
तयांच्याच दुःखा पुरा नाश होई ।।
असे चित्त संतुष्ट ज्यांचे रहाते ।
तयांचीच बुद्धी पहा स्थीर होते ।। ६५ ।।

अशी स्थीर बुद्धी जयांची असेना ।
तयांच्या मध्ये भावना ही वसेना ।।
तया लागि शांती कशी ती असेल ।
अशांतीमुळे सूख कैसे मिळेल ।। ६६ ।।

सदा भोगती इंद्रिये वीषयासी ।
तया मागुनीया गती त्या मनासी ।।
जळी वायु खेचीत नौका जशी ती ।
तशी इंद्रियेही मना खेचती ती ।। ६७ ।।

म्हणूनीच बा पार्थराया जयानी ।
अशी इंद्रिये वीषयांच्या मधूनी ।।
पुरी आवरूनीहि स्वाधीन केली ।
तयांचीच बुद्धी पुरी स्थीर झाली ।। ६८ ।।

जिथे सर्व जीवास बा रात्र होई ।
तिथे संयमी जाण जागाच राही ।।
जिथे सर्व हे जीव जागे रहाती ।
तिथे रात्र होई मुनीना पहा ती ।। ६९ ।।

जसा सागरासी कधी भंग नाही ।
नद्यातून पाणी पडूदे कितीही ।।
तसे भोग ज्याला विकारी न होती ।
तया निर्विकारा मिळे पूर्ण शांती ।। ७० ।।

फलाशा पहा सर्व सोडून देतो ।
तसा निस्पृही होऊनीया रहातो ।।
जयाला असेना अहंता ममत्व ।
तया शांतिचा लाभ होई सदैव ।। ७१ ।।

असे हीच ब्राह्मी स्थिती पार्थराया ।
कधी ना पडे मोह ती पावलीया ।।
तशी अंतकाळी स्थिती तीच राही ।
तसे ब्रह्मनिर्वाण तो मेळवीही ।। ७२ ।।

* * *

असा पार्थ कष्टी परी धीर देती ।
तया सांख्य जे ज्ञान ते सांगताती ।।
असे दोन अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णु पुत्रे कथीले ।।

## अध्याय तिसरा

# कर्मयोग

अर्जुन म्हणाला

जरी ज्ञान कर्माहुनी थोर होई।
तसेची तुम्हीही तया मानताही ।।
तरीही मला घोर कर्मात वाया।
कसे घालिता हो प्रभो देवराया ।। १ ।।

असे काहि संदिग्धही बोलुनी ते ।
जणू घालिता मोह माझ्या मनाते ।।
परी होय कल्याण माझे कशाने ।
असे एक सांगा तुम्ही निश्चयाने ।। २ ।।

श्रीभगवान म्हणाले

पहा दोन निष्ठा रहाती जगी या ।
तुला बोलिलो मीच मागे कळाया ।।
असे सांख्य जी ज्ञान योगे जहाली ।
दुजी कर्म योगास ती बोलियेली ।। ३ ।।

जरी कर्म आरंभ तूं टाळियेला ।
तरी ना मिळे लाभ नैष्कर्म्यं तेला ।।
तसे प्राप्त कर्मा जरी टाळियेले।
तरी जाण सिद्धीस तू दूर केले ।। ४ ।।

पहा मानवासी मुळी पार्थराया ।
अशक्येच्च कर्मा विणे बा रहाया ॥
सदा प्रकृतीच्या गुणांच्या बळाने ।
करी कर्म तोची पराधीनतेने ॥ ५ ॥

पहा इंद्रियासी बळे रोधुनिया ।
मनी वीषयासी असे चिंतुनिया ॥
असा वाह्य आचार जे दाखवीती ।
तया लागि दांभीकची बोलताती ॥ ६ ॥

परी इंद्रियासी पुरे आवरोनी ।
तशी कर्म योगात जो राबवूनी ॥
मना निग्रहूनी अनासक्त राही ।
तया आगळी श्रेष्ठता प्राप्त होई ॥ ७ ॥

स्वधर्मोक्त कर्मे सदा आचरावीं ।
अकर्माहुनी योग्य ती ओळखावी ॥
जरी प्राप्त कर्मास तूं सोडशील ।
तरी देह यात्रा कशी ती निभेल ॥ ८ ॥

सदा यज्ञ कार्यार्थि कर्मे उचीत ।
परी वेगळी ती नरा बाधतात ॥
तरी देव कार्यार्थि कर्मे करावीं ।
अनासक्त होऊन ती आचरावी ॥ ९ ॥

प्रजेच्यासवे यज्ञ निर्माण केला ।
तया वेळी ब्रह्मा असे बोलियेला ।।
तुम्हा लागि यज्ञेच्च उत्कर्ष होवो ।
तसे काम धेनूपरी इष्ट देवो ।। १० ।।

जरी देव संतुष्ट यज्ञे कराल ।
तरी इष्ट देऊनि ते फेडतील ।।
असे एकमेकास संतोषवूनी ।
तुम्ही आपल्या घ्या हिता मेळवूनी ।। ११ ।

पहा देव यज्ञेच संतुष्ट होती ।
पुढे भोग इच्छेप्रमाणेच देती ।।
जरी भोगती ते विना अर्पिलीया ।
तरी चोर होतात ते पार्थराया ।। १२ ।।

परि यज्ञ शेषान्न जे सेविताती ।
तरी संत ते दोष निर्मुक्त होती ।।
स्वतःसाठी ते फक्त जो शीजवीतो ।
तरी जाण पापीच तो पाप खातो ।। १३ ।

पहा जीव अन्नात निर्माण झाले ।
तसे अन्न पर्जन्य योगे मिळाले ।।
तसाचीहि पर्जन्य यज्ञेच येतो ।
तसा यज्ञ कर्मातुनी प्राप्त होतो ।। १४ ।।

तसे कर्म वेदामधूनी निघालें ।
तसे वेद हे अक्षरातून आले ।।
जगा व्यापि हे अक्षर ब्रह्म जाण ।
अधिष्ठीत यज्ञात राही भरून ।। १५ ।।

रहाते जगी या असे यज्ञचक्र ।
तया पार्थराया न जो चालवील ।।
तरी इंद्रियासक्त पापीच ही तो ।
असा मूढ तो व्यर्थ जन्मास येतो ।। १६ ।।

परी जाण आत्म्यात जो दंग झाला ।
तसा जोहि आत्म्यात रंगून गेला ।।
तसाचीहि आत्म्यात संतुष्ट राही ।
तया मात्र कर्तव्य काहीच नाही ।। १७ ।।

करो ना करो कर्म तो पार्थराया ।
तया लाभ हानी नसेची जगी या ।।
तसाची कुठेची नि कोणाकडेची ।
मुळी हेतु त्याचा नसे गुंतलाची ।। १८ ।।

म्हणूनीच तूही अनासक्त होई ।
करी तूहि कर्तव्य कर्में सदाही ।।
अनासक्त होऊन तीं जो करीतो ।
परंधाम तोची पहा मेळवितो ।। १९ ।।

विदेह्यादिकानीहि कर्मेच केली।
म्हणूनीच सिद्धी तयाना मिळाली ।।
तसे लोक कल्याण लक्षून तूही ।
करी योग्य कर्तव्यकर्मे तशी ही ।। २० ।।

असे थोरले लोक कर्मे करीती ।
तसे अन्य तेही करू लागताती ।।
जसे ज्या प्रमाणेच ते वागताती ।
तसे लोकही ते पहा वर्तताती ।। २१ ।।

मला या त्रिलोकात कर्तव्य नाही ।
तसेची अपेक्षा मला ती न काही ।।
तसेचीहि अप्राप्य काही नसून ।
तरी मी करी कर्म जे प्राप्त जाण ।। २२ ।।

पह्य आळशी मी जरी होउनीया ।
दिले कर्म सोडूनिया पार्थराया ।।
तरी लोक हे जाण सर्व प्रकारे ।
पहा मार्ग माझाच घेतील सारे ।। २३ ।।

जरी मीच कर्मासही सोडियेले ।
तरी नष्ट नी भ्रष्ट होतील सारे।।
तसा संकराचाहि कर्ता ठरेन।
प्रजा घातकी मीच होईन जाण ।। २४ ।।

म्हणूनहि जे अज्ञ आसक्ततेने ।
करीतात कर्मे जशी ते मनाने ॥
तशी ती अनासक्त सूज्ञे करावी ।
जनांच्या हिता कारणें आचरावी ॥ २५ ॥

अशा नेणत्या कर्मठांच्या मनाचा ।
करूची नये बुद्धिचा भेद साचा ॥
बुधे योग्य ती सर्व कर्मे करावी ।
तशी अज्ञ लोकासही शीकवावी ॥ २६ ॥

अशी सर्व कर्मे जनांच्या कडूनी ।
खरी चालती प्रकृतीच्या गुणानी ॥
परीही अहंते मुळे मूढ जो तो ।
खरा मीच कर्ता असे खूळ घेतो ॥ २७ ॥

गुणांच्या प्रवृत्तीच कर्मात येती ।
खरे ज्ञानवेत्तेच पाहून घेती ॥
गुणातूनि कर्मे असे मानुनिया ।
शहाणा न गुंते तिथे पार्थराया ॥ २८ ॥

गुणे प्रकृतीच्याच मोहून गेले ।
गुणी आणि कर्मीच आसक्त झाले ॥
अशा मंद अल्पज्ञ साऱ्या जनाया ।
नये चाळवू त्या बुधे पार्थराया ॥ २९ ॥

सदा चित्ति अध्यात्म बुद्धी धरावी ।
मला सर्व कर्मेंहि अर्पीत जावी ॥
फलाशा ममत्वास सोडून द्यावें ।
तसे शोक टाकून युद्धा उठावें ॥ ३० ॥

जरी लोक श्रद्धा धरूनी रहाती ।
तसे मत्सरीही कुणासी न होती ॥
मतानेच माझ्या सदा वागताती ।
तरी कर्म बंधातुनी मुक्त होती ॥ ३१ ॥

परी लोक जे दोषदृष्टी धरून ।
मते माझि देती झुगारूनि जाण ॥
तरी मूढ ते ज्ञानही घालवूनी ।
तसा नाश सर्वस्व घेती करूनी ॥ ३२ ॥

सदा जीव हे स्वस्वभावे रहाती ।
तसे स्वस्वभावेच ज्ञानीहि जाती ॥
स्वभावा प्रमाणे जगाचीहि चाल ।
तिथे निग्रही काय पार्था करील ॥ ३३ ॥

जिथे इंद्रिये वीषयी राहताती ।
तिथे निश्चये द्वेष आणीक प्रीती ॥
परी त्यास आधीन कोणी न व्हावे ।
रिपू तेच मार्गात हें ओळखावें ॥ ३४ ॥

जरी का उणा आपला धर्म भासे ।
परांचा दिसे तोच सोपा विशेषे ॥
तरीही स्वधर्मात मृत्यू हिताचा ।
दुजे धर्मि धोका असे जाण साचा ॥ ३५ ॥

अर्जुन म्हणाला

मनुष्यास जे पाप वाटे करावे ।
तशी प्रेरणा कोण देतो स्वभावे ॥
स्वताहास इच्छा नसूनीहि जाण ।
बळानेंच बुद्धीस खेचीत कोण ॥ ३६ ॥

श्रीभगवान म्हणाले

पहा काम नी क्रोधही तोच आहे ।
रजाच्या गुणातून या जन्म राहे ॥
महा पापि खादाड हा जाण भारी ।
तसाचीहि या लोकि हा जाण वैरी ॥ ३७ ॥
धुराने जसा अग्नि झाकून जाई ।
धुळीने जसा आरसा घाण होई ॥
जसे गर्भ वारेतची वेष्टियेले ।
तसे ज्ञान कामात झाकून गेले ॥ ३८ ॥
असे झाकिले ज्ञान याने सदाही ।
तसा वैरि हा ज्ञानियांचाहि होई ॥
तसा अग्नि हा कामरूपे महान ।
कधीहि नव्हे तृप्त हा पूर्ण जाण ॥ ३९ ॥

तयासी असे आसरा इंद्रियांचा ।
तसा बुद्धिचा नी तसाची मनाचा ॥
अशा कारणाने पहा ज्ञान झाकी ।
तसे मानवालागि मोहात टाकी ॥ ४० ॥
म्हणूनीच पार्था अशीं इंद्रियेंही ।
खरी आधि तू पूर्ण जिंकून घेई ॥
महापापि जो ज्ञान विज्ञान नाशी ।
कशाला अशा ठेवितोसी रिपूसी ॥ ४१ ॥
जरी थोर ही इंद्रिये बोलताती ।
तरी त्यास भारी मना मानताती ॥
मनाहूनि या थोर बुद्धी असून ।
तिच्याहून आत्मा असे थोर जाण ॥ ४२ ॥
अशा याच आत्म्यास तू ओळखावें ।
पुढे बुद्धिनेही मना आवरावें ॥
पुढे काम रूपी महा शत्रुला या ।
पुरा नाश त्याचा करी पार्थराया ॥ ४३ ॥

* * *

करी कर्म पार्था अनासक्ततेने ।
अकर्मी रहावें कसें मानवाने ॥
असे तीन अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

## अध्याय चौथा

# कर्मब्रह्मार्पणयोग

भगवान म्हणाले

अवीनाश हा योग पूर्वी रवीला ।
पहा मीच पार्था असे बोलियेला ॥
पुढे तो रवी बोलियेला मनूसी ।
पुढे बोलिला तोहि इक्ष्वाकुपासी ॥ १ ॥

अशा या क्रमाने पहा योग आला ।
पुढे लाभ त्याचा ऋषींना मिळाला ॥
पुढे तो बहू काळ होता जगी या ।
परी लोपला तो पुढे पार्थ राया ॥ २ ॥

पुराणा असा योग तो हाच आहे ।
तुला आज मी जो पुन्हा सांगताहे ॥
सखा तूच माझा तसा भक्त तूही ।
म्हणूनी दिले गूज हे थोर पाही ॥ ३ ॥

अर्जुन म्हणाला

तुम्ही ह्याच काळात जन्मास आला ।
रवी फार प्राचीनची जन्मलेला ॥
तयालागि पूर्वी प्रभो कृष्णदेवा ।
तुम्ही बोलिला तो कसा ओळखावा ॥ ४ ॥

श्रीभगवान म्हणाले

बहू जन्म माझे तसेची तुझेही ।
असे भूतकाळात झाले कितीही ॥
अशा सर्व जन्मास मी जाणताहे ।
परी ते तुला जाणणे शक्य नोहे ॥ ५ ॥

अजन्माच मी बा अवीनाश राही ।
तसाचीहि मी या जगाचा प्रभूही ॥
अधिष्ठीत मी प्रकृतीमाजि होतो ।
तसा योग माया गुणे जन्म घेतो ॥ ६ ॥

स्वधर्मासि जेव्हा कधीही जगीया ।
अतीग्लानि येते सख्या पार्थराया ॥
तसाचीहि माजून राही अधर्म ।
अशावेळि मी घेउनी येइ जन्म ॥ ७ ॥

तसा संत साधूस सांभाळ द्याया ।
तसा नाशही दुर्जनांचा कराया ॥
तसा धर्म संस्थापनेसाठी येतो ।
युगानूयुगे मी असे जन्म घेतो ॥ ८ ॥

असे दिव्य मत्‌जन्म नी कर्म आहे ।
यथार्थें असे पूर्ण जो जाणताहे ॥
तया देह गेल्या पुनर्जन्म नाही ।
तसा मत्स्वरूपामधे लीन होई ॥ ९ ॥

अनासक्त राही नि भीतीहि नाही ।
नसे क्रोध काही अनन्ये सदाही ॥
तसे ज्ञानरूपी तपे शुद्ध झाले ।
असे ते बहू मत्पदासी मिळाले ॥ १० ॥

मला लोकही जे जसे पूजिताती ।
तयानाही माझी तशीची प्रचीती ॥
जसा वागतो मी जगी या सख्यारें ।
तसे वागती नित्य हे लोक सारे ॥ ११ ॥

परी कोणि कर्मी फलाशा धरीती ।
असे अन्य देवा भजू लागताती ॥
इथे याच लोकी तशाही फलाते ।
बहू शीघ्र सिद्धी मिळे या जनाते ॥ १२ ॥

गुणातील कर्मामुळे भेद झाले ।
तसे चारही वर्ण मी निर्मियेले ॥
तयांचा जरी मीच कर्ताहि आहे ।
तरी मी अकर्ता अवीनाश राहे ॥ १३ ॥

मला कर्म बाधा मुळीही असेना ।
फलाशेत इच्छा कधीही वसेना ॥
यथार्थे असे जो मला ओळखीतो ।
तरी कर्मबंधातुनी मुक्त होतो ॥ १४ ॥

असे जाणुनी तत्व हे पूर्वकाळी ।
मुमुक्षू जनांनीही कर्मेंच केली ॥
म्हणूनीहि तूं पूर्वजासी स्मरावे ।
स्मरूनी तसे कर्म तूही करावे ॥ १५ ॥

अकर्मात कर्मातही भेद काय ।
असे पंडितासीहि कोडेच होय ॥
तरी सांगतो तेंहि ऐकून घेई ।
पुरे जाणुनी तूहि निष्पाप होई ॥ १६ ॥

पहा कर्म कैसे कसे ओळखावे ।
कसे त्या विकर्मासि जाणून घ्यावे ॥
अकर्मास घ्यावे कसे ओळखून ।
गती ही अती गूढ कर्मास जाण ॥ १७ ॥

अकर्मास कर्मात जो ओळखीतो ।
अकर्मात कर्मास जाणून घेतो ॥
तरी तोच ज्ञानी तसा योगयुक्त ।
तसा कर्मकर्ताहि तो मानवात ॥ १८ ॥

तसे सर्व उद्योग जो चालवितो ।
परी जो फलेच्छास सोडून देतो ॥
करी भस्म ज्ञानाग्निने कर्म सारे ।
तया बोलती सर्व ज्ञानी सख्यारे ॥ १९ ॥

फलासक्ति कर्मात सोडून देई ।
सदातृप्त आणीक निर्हेतु राही ॥
जरी तोच कर्मे करावी म्हणाला ।
तरी तो करूनी अकर्ता जहाला ॥ २० ॥

निरिच्छा तसा संयमी जो सदाही ।
तसा त्यागही सर्व संगास राही ॥
शरीरे जरी फक्त कर्मे करीतो ।
तरी पात्र दोषा कधीही न होतो ॥ २१ ॥

मिळे त्यामधे गोड मानून राही ।
नसे द्वंद्व बाधा असूयाहि नाही ॥
जयासी यशापेश दोन्ही समान ।
करूनीहि कर्मे न तो बद्ध जाण ॥ २२ ॥

अनासक्त निःसंग नी संयमीही ।
सदा स्थीर चित्ते स्वरूपात राही ॥
जयाचे पहा कर्म यज्ञार्थ होते ।
तयाचे असे कर्म लोपून जाते ॥ २३ ॥

जया यज्ञ साहित्यची ब्रह्म होई ।
तशी साधने सर्वही ब्रह्म पाही ॥
जयाची अशी बुद्धि ब्रह्मी निवाली ।
तशीची फळेही तया ब्रह्म झाली ॥ २४ ॥

कुणी देव ऊपासना चालवीती ।
तयालागि ते यज्ञची मानताती ॥
कुणी ब्रह्मरूपास अग्नी धरून ।
तिथे ईश्वरा अर्घ्य देती स्मरून ॥ २५ ॥

कुणी संयमाग्नी धरूनी रहाती ।
तिथे होम श्रोत्रादिकांचा करीती ॥
कुणी इंद्रियाग्नीच मानूनि त्यात ।
तिथे वीषयासी पहा अर्पितात ॥ २६ ॥

मनो निग्रहासीच अग्नी घरीती ।
तया ज्ञानयोगे पुढे चेतवीती ॥
तिथे प्राण नी इंद्रियांच्या क्रियाही ।
कुणी अर्पिती त्यातची सर्व पाही ॥ २७ ॥

कुणी द्रव्य यज्ञास ही आचरीती ।
अहिंसादि योगा तपा चालवीती ॥
कुणी ज्ञान आणीक स्वाध्याय यज्ञ ।
करीती असें यज्ञ कित्येक सूज्ञ ॥ २८ ॥

अपानास अग्नी धरूनीही प्राण ।
तसा प्राण अग्नी धरूनी अपान ॥
अपाना नि प्राणा असा होम देती ।
असे प्राणवायूस साधून घेती ॥ २९ ॥

करूनीहि आहार नेमस्त कोण ।
करी होम प्राणातची प्राण जाण ॥
असे सर्व हे यज्ञवेत्तेच होती ।
असे प्राणवायूस साधून घेती ॥ ३० ॥

असे यज्ञ शेषामृते जाण धाले ।
अवीनाश ते ब्रह्म त्याना मिळाले ॥
जगी सूख यज्ञाविणे जेथ नाही ।
तरी तेच स्वर्गात कोठून होई ॥ ३१ ॥

बहूवीध हे यज्ञ वेदाकडून ।
असे निर्मियेलेच आहेत जाण ॥
पहा जन्म कर्मात आहे तयासी ।
असे जाणलीया पहा मुक्त होसी ॥ ३२ ॥

पहा अर्जुना प्राण यज्ञाहुनीही ।
असे ज्ञानयज्ञास श्रेष्ठत्व पाही ॥
अशी सर्व कर्मे पहा शेवटी ती ।
पुरी जाण ज्ञानामधे लीन होती ॥ ३३ ॥

म्हणूनीच जे तत्ववेत्ते शहाणे ।
तयाना पहा तू अती नम्रतेने ॥
विचारूनि घेई असे ज्ञान थोर ।
तरी प्रीतिने ते तुला सांगतील ॥ ३४ ॥

असे ज्ञान-हेतू जरी मेळवीशी ।
तरी मोह जाईल बा पुण्यराशी ॥
तुझे ठायि भूते पुढे पाहशील ।
तशी तीच ब्रह्यातही दीसतील ॥ ३५ ॥

जरी तूहि पाप्यामधे थोर पापी ।
असे मानले जाण पार्था तथापी ॥
तरी ज्ञान नौका मिळाल्यास ऐशी ।
पुरा या भवाब्धीतुनी पार होसी ॥ ३६ ॥

जसा अग्नि पेटून होतो प्रदीप्त ।
पुढे सर्व काष्ठे करी भस्मसात ॥
तसा ज्ञान रूपीच अग्नी समूळी ।
पुढे जाण कर्मेच तो सर्व जाळी ॥ ३७ ॥

पवित्रात ज्ञानाप्रमाणे जगी या ।
दुजे काहि नाही सख्या पार्थराया ॥
म्हणूनीच हा कर्मयोगी कसेही ।
पुढे ज्ञान हे पूर्ण साधूनि घेई ॥ ३८ ॥

जितेंद्रीय भावीक नी संयमी तो ।
पुढे ज्ञानही तो पुरे मेळवी तो ॥
पुरे ज्ञान झाल्यावरी बा तयाते ।
परा शांति पाही पुरी प्राप्त होते ॥ ३९ ॥

जया ज्ञान नाही नि श्रद्धाहि नाही ।
तरी संशयामाजि राही सदाही ॥
तयासी नसे ईह ना स्वर्गलोक ।
अशा संशयात्म्यास कोठून सूख ॥ ४० ॥

तरी कर्म जो अर्पितो योगमार्गें ।
करी संशया नाश जो ज्ञानयोगे ॥
अशा आत्मनिष्ठास कर्मं करूनी ।
मुळी बंध त्यांचा न होई कशानी ॥ ४१ ॥

म्हणूनीच अज्ञान योगे तुझ्याही ।
मनी संशयासीच थारा सदाही ॥
तया ज्ञानखड्गे पुरे छेदुनीया ।
पुरा योग साधी उठी पार्थराया ॥ ४२ ॥

* * *

असे कर्म ज्ञानी करूनी अकर्ते ।
तसे तू करी उठ घे निश्चयाते ॥
असे चार अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णु पुत्रे कथीले ॥

### अध्याय पाचवा

# कर्मसंन्यासयोग

अर्जुन म्हणाला

प्रभो थोर संन्यास तुम्ही म्हणाला ।
तसे कर्मयोगासही बोलियेला ॥
तरी यामधेची असे थोर कोण ।
मला तेच निश्चीत सांगा करून ॥ १ ॥

श्रीभगवान म्हणाले

पहा योग आणीक संन्यास राया ।
तसे दोन्हिही योग्य मोक्षास जाया ॥
परी जाण संन्यासमार्गाहुनीही ।
खरे कर्मयोगास श्रेष्ठत्व येई ॥ २ ॥

जया द्वेष आणीक इच्छा नसेची ।
तरी नित्य संन्यासिही जाण तोची ॥
तसा पूर्ण द्वंद्वानिराळा जहाला ।
सुखानेच बंधातुनी तो निघाला ॥ ३ ॥

पहा सांख्य नी योग हे वेगळाले ।
पहाती तया अज्ञची मानियेले ॥
जरी एकिचा योग्य आचार केला ।
फले लाभती दोन्हिचीही तयाला ॥ ४ ॥

पहा स्थान सांख्यास[1] जे लाभते ते ।
तसे तेच योग्यासही लाभ देते ॥
खरे दोन्हि हे एक रूपीच होती ।
असे जाणती ते यथार्थे पहाती ॥ ५ ॥

खरे जाण संन्यास हा मार्ग राया ।
नसे साध्य योगाविणे आचराया ॥
पहा जो मुनी राहतो योगयुक्ते ।
तया ब्रह्म हे शीघ्रची प्राप्त होते ॥ ६ ॥

पहा अंतरी शुद्ध जो का रहातो ।
मना इंद्रियासीहि जिंकून घेतो ॥
तसे सर्व जीवास आत्म्यात पाही ।
असा योगि कर्मी अलिप्तेच राही ॥ ७ ॥

निजे श्वास घेतो तसा वास घेतो ।
तसा ऐकतो नी तसा अन्न खातो ॥
तसा चालतोही तसा बोलतोही ।
धरी सोडतोही तसा पाहतोही ॥ ८ ॥

अशी इंद्रियेची सदा वागताती ।
सदा आपल्या वीषयासी पहाती ॥
न काही करी मी असे मानुनीया ।
जगी राहतो योगी तो पार्थराया ॥ ९ ॥

---

१ कर्म संन्यास करणाऱ्यास

असे कर्म ब्रह्मास अर्पूनिया तो ।
तसेची तयासी अनासक्त होतो ॥
जळी पद्म जैसे तसा तोहि राही ।
तसे पापही त्यास ना लिप्त होई ॥ १० ॥

जसा बुद्धिने इंद्रियांनी नि देही ।
तसाची मनाने अनासक्त होई ॥
असा आत्मशुद्धयर्थ योगी पहा तो ।
सदा फक्त कर्मासची आचरीतो ॥ ११ ॥

फले योगि तो सर्व सोडून देई ।
तशी स्थीर शांतीहि तो मेळवीही ॥
परी कामना जो धरूनी रहातो ।
फलाशे मुळे तो पहा बद्ध होतो ॥ १२ ॥

जितेंद्रीय हा सर्व कर्मे मनाने ।
पूरी देइ सोडून तो निश्चयाने ॥
न करवी करीनाहि तो संयमाने ।
नवद्वारपूरीत राही सुखाने ॥ १३ ॥

जनांच्या कृतीला नि कर्तेपणाला ।
प्रभू घालिना हात ती निर्मिण्याला ॥
तसेची फलांच्या पहा योजनेते ।
स्वभावेंच ते प्रकृतीतून होते ॥ १४ ॥

प्रभू तो कुणाचेहि ना पुण्य घेई ।
तसे पाप तेही मुळी ना शिवेही ॥
खरे झाकिले ज्ञान अज्ञानतेने ।
पहा जीव हा मोह पावे तयाने ॥ १५ ॥

खरे ज्ञान पार्था जहाले जयासी ।
तयांचेच अज्ञान जाते लयासी ॥
असे ज्ञान हे जाण सूर्यासमान ।
प्रकाशात येते परब्रह्म जाण ॥ १६ ॥

स्वरूपी मने बुद्धिने दंग झाले ।
तसे ब्रह्मरूपात रंगून गेले ॥
असे ज्ञानयोगेच निष्पाप होती ।
पुनर्जन्मवासा कधीही न येती ॥ १७ ॥

विनम्री शहाणा अशा ब्राह्मणासी ।
तशी गाय आणीक तैसे गजासी ॥
तसे श्वान आणीक चांडाळ जाण ।
सदा पंडितालागि वाटे समान ॥ १८ ॥

मनाने समत्वात जो स्थीर झाला ।
तयाने इथे मृत्यूही जिंकियेला ॥
परब्रह्म निर्दोष राही समान ।
स्थिरावे स्वभावेच ब्रह्मात जाण ॥ १९ ॥

अशी बुद्धि ब्रह्मात सुस्थीर झाली ।
सुखानेच निर्मोहताही मिळाली ॥
जरी इष्ट लाभे न त्या हर्ष होई ।
तसे अप्रिये तो न दुःखी कधीहि ॥ २० ॥

जया वीषयामाजि आसक्ति नाही ।
तया सूख आत्म्यात लाभे सदाही ॥
असा युक्त तो जाण ब्रह्मी स्थिरावे ।
तिथे अक्षयानंद आनंद पावे ॥ २१ ॥

पहा इंद्रियांतून जे भोग येती ।
असे भोग तेची अती दुःख देती ॥
पहा जन्म नी नाश आहे तयाना ।
म्हणूनी तिथेची रमेना शहाणा ॥ २२ ॥

पहा देहपाताचिये पूर्व काली ।
रिपू काम नी क्रोध जे दुष्ट भारी ॥
तयांचे पहा वेग जो जिकी पूर्ण ।
खरा तोचि योगी सुखी तोचि जाण ॥ २३ ॥

असा अंतरी जो सुखाने रहातो ।
तसा अंतरात्म्यात आराम होतो ॥
तिथेची मिळे त्यास अंतःप्रकाश ।
तसे ब्रह्म आनंद लाभे तयास ॥ २४ ॥

पहा दोष शंका पुरे नष्ट झाले ।
जयानी मनसीही स्वाधीन केले ॥
हितालागि भूतांचिये दक्ष होती ।
मुनी ब्रह्मनिर्वाण[1] ते पावताती ॥ २५ ॥

रिपू काम नी क्रोध हे जिंकियेले ।
तसेची मनोनिग्रहा राखियेले ॥
तरी तेच आत्मज्ञ संपन्न होती ।
यती ब्रह्म निर्वाण ते पावताती ॥ २६ ॥

बहिष्कार जो वीषयालागि घाली ।
तशी दृष्टि भ्रूसंगमी स्थीर केली ॥
तसे नासिकस्थानिही पार्थराया ।
आपाना नि प्राणा[2] समा ठेवूनीया ॥ २७ ॥

तशी इंद्रिये आणि बुद्धी मनासी ।
करी संयमासी पहा पुण्यराशी ॥
भय क्रोध इच्छाहि सोडून देतो ।
असा तो मुनी मुक्त होऊन जातो ॥ २८ ॥

---

१ ब्रह्मानंद. २ अपान व प्राणवायू.

असे मीच भोक्ताहि यज्ञात साचा ।
तसाची सखा मीहि सर्वा जिवांचा ॥
असे जो यथार्थें मला ओळखीतो ।
तरी सूख, शांतीस तो मेळवितो ॥ २९ ॥

* * *

खरे योग संन्यास दोन्ही अभिन्न ।
परी त्यात योगी असे थोर जाण ॥
असे पाच अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

93408

## अध्याय सहावा

# आत्मसंयमयोग

श्रीभगवान म्हणाले

फलांची अपेक्षा कधीही करीना ।
तसाचीही कर्तव्य कर्मा चुकेना ॥
तरी तोच संन्यासि योगीही तोची ।
क्रिया हीन निर्यज्ञ नाही कधीची ॥ १ ॥

जयालागि संन्यास मार्गी म्हणावें ।
तयालागिही योगमार्गी गणावें ॥
खरें जाण संकल्प त्यागाविणेही ।
मुळी योगि कोणीचही होत नाही ॥ २ ॥

मुनी योग इच्छा पहा जे करीती ।
तरी कर्मची साधनासी धरीती ॥
तसे योग आरूढ जे जे जहाले ।
तरी साधनासी शमासी[1] धरीले ॥ ३ ॥

अनासक्त कर्मात जो योगि होतो ।
तसा वीषयी जो विरक्ते रहातो ॥
तसा सर्व संकल्प ही टाकलेला ।
तरी योग आरूढ तो बोलियेला ॥ ४ ॥

---

१ मन:शांतीला

निजोद्धार पाही स्वयेंची करावा ।
अधःपात तोही स्वयेची त्यजावा ॥
स्वये होय बंधू स्वतःचाच होतो ।
तसा होय शत्रू स्वतःसी करीतो ॥ ५ ॥

स्वयेची स्वतःस जिंकून घ्यावे ।
तरी मित्र होतो पहा त्या स्वभावे ॥
परी ओळखीना जरी जो स्वतःला ।
तरी आपणासीच तो शत्रु झाला ॥ ६ ॥

जसे शीत नी ऊष्ण मानापमान ।
तसे दुःख सूखातही शांत मन ॥
अशा आत्मजीतास ज्ञाने सदाही ।
दिसे ब्रह्म सर्वत्र ते एक पाही ॥ ७ ॥

सदा ज्ञान विज्ञान योगे सुखी तो ।
तसे इंद्रियासीहि जिंकून घेतो ॥
जयालागि सोने नि माती समान ।
अशा योगिया मुक्त नामाभिधान ॥ ८ ॥

जसा मित्र शत्रू तसा द्वेष्य बंधू ।
असो पापि मध्यस्थ आणीक साधू ॥
उदासीन वैरी अशांच्या ठिकाणी ।
असे सारखी बुद्धि तो श्रेष्ठ मानी ॥ ९ ॥

सदा शांत एकांतवासी बसावे ।
तिथे ध्यानही एकचित्ते धरावे ॥
फलाशा तसा पाश सोडून द्यावा ।
असा नित्य अभ्यासही आचरावा ॥ १० ॥

शुचिर्भूतसे स्थान पाहून घ्यावे ।
तिथे स्थीरशा आसनासी करावे ॥
बहू खोल नी उंचही ते नसावे ।
वरी दर्भ चर्मा पटा[1] अंथरावे ॥ ११ ॥

तशीचीहि चित्तेंद्रिये आवरावी ।
मनालागि एकाग्रता बाणवावी ॥
असा आत्मशुद्ध्यर्थ अभ्यास घ्यावा ।
तसा योग हा नित्यही चालवावा ॥ १२ ॥

तसा देह नी शीर आणीक मान ।
असावे पहा स्थीर तैसे समान ॥
तशी दृष्टि नासाग्रि ठेवून घ्यावी ।
सभोवार कोठे मुळी ती न जावी ॥ १३ ॥

तसे शांत निश्चित व्हावे मनाने ।
रहावे तसे ब्रह्मचर्य व्रताने ॥
मना आवरावे नि मच्चित्त व्हावे ।
सदोदीत अभ्यासयुक्ते रहावे ॥ १४ ॥

---

१ दर्भ, मृगाचें कातडें व वस्त्र

असा नित्य अभ्यास जो आचरीतो ।
तसेची मनाला पुरे आवरीतो ॥
परा थोर शांती तया प्राप्त होते ।
स्वरूपात माझ्या तशी जी रहाते ॥ १५ ॥

पहा फार जो कोणि आहार घेतो ।
अजीबात जो कोणि सोडून देतो ॥
अती जाग किंवा अती झोप घेई ।
तया साध्य हा योग नाही कधीही ॥ १६ ॥

मिताहारि तैसा विहारीही जाण ।
तशी झोप नी जाग घे आवरून ॥
तरी योग हा दुःखनाशी सदाही ।
तयासीच पार्था पुरा साध्य होई ॥ १७ ॥

जयाचें पहा चित्त स्वाधीन होते ।
तसे आत्मरूपात रंगून जाते ॥
तशा कामना सर्व टाकून देई ।
तया युक्त योगी असे बोलतीही ॥ १८ ॥

जसा दीप निर्वात जागी रहातो ।
तिथे शांत राहूनिही स्थीर होतो ॥
तसा योगि आत्म्यामधे मग्न होई ।
तयासी पहा ऊपमा शोभते ही ॥ १९ ॥

पहा चित्त जेथे निरोधून ध्यावे ।
तिथे योगि तो जाण स्थीरत्व पावे ॥
जिथे अंतरामाजि आत्म्यास पाही ।
तिथे तो स्वताहाच संतुष्ट होई ॥ २० ॥

अतींद्रीय ते बुद्धिला गम्य होते ।
महासूख तेथेच लाभास येते ॥
असा आत्मतत्वी जिथे लीन होई ।
तिथूनी कदापी ढळेना कधीही ॥ २१ ॥

अशा या स्थितीतील लाभाहुनीही ।
दुजा लाभ मोठा न वाटे कदाही ॥
तसे या स्थितीमाजिही राहताना ।
कदापीहि तो थोर दुःखे चळेना ॥ २२ ॥

पहा योग ऐशा स्थितीला म्हणावें ।
जिथे दुःखसंस्कारही नाश पावे ॥
अशा योगमार्गात उत्सूकतेने ।
सदा घेइ अभ्यास तो निश्चयाने ॥ २३ ॥

पहा काम संकल्प जे ऊठतीही ।
तरी त्यास निःशेष सोडून देई ॥
तशीं इंद्रियें हीं मनें आवरावी ।
प्रयत्ने पहा सर्व रोधून घ्यावी ॥ २४ ॥

क्रमाने पहा शांति ही स्थीरवावी ।
तसेचीहि वुद्धीमध्ये धैर्य ठेवी ॥
मनालागि आत्म्यात सुस्थीरवावे ।
दुज्या चिंतनालागि सोडून द्यावे ॥ २५ ॥

अती या मनालागि चांचल्य राही ।
पराव्या ठिकाणात धावून जाई ॥
तरी तेथुनी त्यास ओढून घ्यावे ।
पुन्हा आत्मरूपी तया स्थीरवावे ॥ २६ ॥

असा योगी पाही मनी शांत झाला ।
रजोगूण तोही पुरा नाश केला ॥
तसा ब्रह्मरूपात ही ऐक्य होई ।
तसा थोर आनंद तो मेळवीही ॥ २७ ॥

असा योग अभ्यास जो नित्यसाधी ।
तरी योगि तो होइ निष्पापबुद्धी ॥
अनायासि राही सुखी तो सदाही ।
स्वरूपी सुखानंद आनंद पाही ॥ २८ ॥

जगी सर्व भूतांत पाही भुतासी ।
तसे आत्मठायीच पाही स्वतःसी ॥
अशा जाण योगात जो स्थीर झाला ।
समा दृष्टी राही सदाची तयाला ॥ २९ ॥

मला जाण सर्वांत तो पाहताहे ।
तसे सर्वही जाण माझ्यात पाहे ॥
तयाचाच मी सर्व होऊन राही ।
तसाचीहि तो होय माझा सदाही ॥ ३० ॥

पहा जो अभेदे मना स्थीरवूनी ।
भजे सर्व भूती मलाची स्मरूनी ॥
कसाही पहा योगि वागे जरी तो ।
तरी जाण माझ्या ठिकाणी रहातो ॥ ३१ ॥

पहा आपणा सारखे सर्व पाही ।
सदा दुःखसूखा समानेच राही ॥
असा साम्य हा योग जो आचरीतो ।
तरी योगि तो श्रेष्ठ सर्वांत होतो ॥ ३२ ॥

अर्जुन म्हणाला

तुम्ही साम्य हा योग जो बोलियेला ।
मना चंचलत्वे न हो स्थीरतेला ॥
कसे त्यास स्थीरत्व हे बाणवावे ।
मना चंचलत्वा कसे थोपवावे ॥ ३३ ॥

मनालागि चांचल्य नी क्षोभकारी ।
तसे ते बळी आणि हट्टीच भारी ॥
जसा वायु तैसेच मोकाट धावे ।
तया निग्रहाने कसे थोपवावे ॥ ३४ ॥

श्रीभगवान म्हणाले

खरे पाहतां या मना पार्थराया ।
अती भारि चांचल्य ते आवराया ॥
परी तेच अभ्यासयोगे स्थिरावे ।
पुढे साध्य वैराग्ययोगे करावे ॥ ३५ ॥
न केले मनालागि स्वाधीन ज्यानी ।
मिळेना असा योग त्याना म्हणूनी ॥
प्रयत्ने पहा तेच स्वाधीन राही ।
अशा या उपायेच ते साध्य होई ॥ ३६ ॥

अर्जुन म्हणाला

असे भाव नी यत्न नाही जहाला ।
तरी काय तो योग मार्गी बुडाला ॥
अशाला गती कोणती प्राप्त होते ।
तयाची स्थिती काय होऊन जाते ॥ ३७ ॥
अतो भ्रष्ट नी तो ततो भ्रष्ट काय ।
कसा ब्रह्म मार्गाकडे तोहि जाय ॥
जसे अभ्रविच्छिन्न तैसे तयाते ।
विनाशी गती काय ते सांग माते ॥ ३८ ॥
अशी माझि शंका असे देवराया ।
मुळातून तीही तुम्हांवाचुनीया ॥
निवारील ऐसा दुजा नाहि कोणी ।
परीहार त्याचा करा चक्रपाणी ॥ ३९ ॥

श्रीभगवान म्हणाले

पहा ईह नी अन्य लोकी मुळीही ।
तया नाश पार्था कदापी न होई ॥
सत्कार्य कर्मेच तो आचरी तो ।
म्हणूनी कधी दुर्गतीला न जातो ॥ ४० ॥

असा भ्रष्ट योगी पहा दीर्घ काल ।
पुढे स्वर्ग लोकात वस्ती करील ॥
शुचिर्भूत श्रीमंत कूळी पहा तो ।
तयांच्या घरी तो पुढे जन्म घेतो ॥ ४१ ॥

पुढे योगि तैसाच ज्ञानी कुळीही ।
अशांच्या घराण्यात जन्मास येई ॥
अशा या तऱ्हेचा पहा जन्म जाण ।
मिळावा तया हे अती भाग्य मान ॥ ४२ ॥

मिळे बुद्धि संस्कार तेथे तयाला ।
असे पूर्व जन्मात जो जोडलेला ॥
पुढे अर्जुना तोचि मोक्षार्थ जाण ।
करीतो पुन्हा यत्न भारी झटून ॥ ४३ ॥
पराधीन झाला तरी ओढ घेतो ।
तया पूर्व अभ्यास मार्गी करीतो ॥
पुढे भक्ति नी योग मार्गात राही ।
तसाची पुढे वेद लंघून जाई ॥ ४४ ॥

प्रयत्ने सदभ्यास तो नित्य साधी ।
तसा होय तो जाण निष्पाप बुद्धी ॥
बहू जन्म संस्कार सिद्धी बळे तो ।
परंधाम माझे असे मेळवीतो ॥ ४५ ॥

तपस्व्याहूनी थोर योगी सुजाण ।
तसा कर्मठाहूनही थोर जाण ॥
तसा योगि ज्ञान्याहूनी थोर आहे ।
म्हणूनीच तू योगि होऊनि राहे ॥ ४६ ॥

परी सर्व योग्यामधे पार्थराया ।
मनालागि माझ्यात जो ठेवुनीया ॥
भजु लागला जाण भक्ती धरूनी ।
तयालाच सर्वात मी थोर मानी ॥ ४७ ॥

* * *

समाधी तसे ध्यान अभ्यास घेती ।
करूनी अशा साधना मुक्त होती ॥
असे षष्ठ अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णु पुत्रे कथीले ॥

## अध्याय सातवा

# ज्ञानविज्ञानयोग

श्रीभगवान म्हणाले

मदाश्रये चित्त ठेवून पार्था ।
असा योग अभ्यासही चालवीता ॥
मला जाणसी निश्चयाने कसे ते ।
तुला सांगतो ऐक ते एक चित्ते ॥ १ ॥

तसे ज्ञान आणीक विज्ञान तेही ।
तुला सांगतो सर्व जाणून घेई ॥
पुरे जाणल्याने पुढे पार्थराया ।
उरेना दुजे जाणण्यासी जगी या ॥ २ ॥

हजारो मनुष्यातुनी एक कोणी ।
करी यत्न तो मोक्ष व्हावा म्हणूनी ॥
अशा त्या अनेकात कोणी क्वचीत ।
खरे जाणतो रूप माझे यथार्थ ॥ ३ ॥

पहा भूमि नी आप नी तेज तेही ।
तसा वायु आकाश नी चित्त पाही ॥
तशी बुद्धि आणी अहंकार यांची ।
अशी अष्टधा प्रकृती जाण साची ॥ ४ ॥

अशा प्रकृतीला म्हणावे कनिष्ठ ।
दुजी जीवरूपा असे ती वरिष्ठ ॥
परेच्यामुळे सृष्टि चैतन्य पावे ।
तशी धारणाही मिळे त्या स्वभावे ॥ ५ ॥

अशा दोन्हिही प्रकृतीपासुनीया ।
पुढे सर्व भूतासही जन्म राया ॥
असा मीच हे विश्व निर्माणकर्ता ।
तसा नाशकर्ता असे मीच पार्था ॥ ६ ॥

निराळे असे श्रेष्ठ माझ्याहुनीही ।
दुजे काहि नाही जगीं या मुळीही ॥
मणी माळ जैसी धरावी सुताने ।
तसे एक मी आणि हे विश्व जाणे ॥ ७ ॥

शशी सूर्य यातील मीची प्रकाश ।
तसे जाण पाण्यामधे मी रसास ॥
नभातील जे शब्द ते मी गणावे ।
मनुष्यातले शौर्य मी ओळखावे ॥ ८ ॥

असे मीच पृथ्वीमधे जो सुवास ।
तसा मीच अग्नीमधे जो प्रकाश ॥
तसे भूतमात्रात चैतन्य मीची ।
तपस्व्यामधे मी तपासी तसाची ॥ ९ ॥

जगाचें तसे बीजही मीच आहे ।
पुराणे तसे मूळही मीच पाहे ॥
तशी मीच बुद्धीहि बुद्धीमतांची ।
तसे तेज तेजस्वियांचेहि मीची ॥ १० ॥

तशी शक्तिवानात मी शक्ति आहे ।
जिला लोभ नी वासनाही न राहे ॥
तशी मीच इच्छाहि सर्वा जिवांची ।
असे मान्य धर्मासि जी सव्यसाची ॥ ११ ॥

तसेचीही तीन्ही गुणांच्या पदार्था ।
तयासीहि ते मूळ मी जाण पार्था ॥
अशा सर्वही वस्तु माझ्यात जाण ।
परी मी नसे त्यात घे ओळखून ॥ १२ ॥

त्रिगूणांत निर्माण झाले विकार ।
तया पाहुनी विश्व मोहे अपार ॥
अवीनाश नी थोर मीची असूनी ।
मलाची खरे ओळखीनात कोणी ॥ १३ ॥

अशी जाण माझी असे दिव्य माया ।
अती कष्ट होती जना या तराया ॥
परी जे मला भक्तिभावे रहाती ।
तरी तेच पार्था तरूनीहि जाती ॥ १४ ॥

तसेचीहि मायेमुळे भ्रांत झाले ।
दुराचारयोगेहि हीनत्व आले ॥
पुढे आसुरी भाव ते जोडताती ।
असे लोक हे ना मला पूजिताती ॥ १५ ॥

सदाचारि जातीहि होतात चार ।
असे भक्त सांगेन त्यांचे प्रकार ॥
मुमुक्षू नि दुःखी तिज्या द्रव्य व्हावे ।
चतुर्थास ज्ञानी असे ओळखावे ॥ १६ ॥

पहा ज्ञानि चारीतही थोर होतो ।
अनन्ये मला भक्तिभावे चहातो ॥
तयासी असे प्रीय मीची म्हणून ।
तसाची मला प्रीयही तोच जाण ॥ १७ ॥

अशा सर्व भक्तात ज्ञानीच थोर ।
मला पांडवा तो खरा प्रीय फार ॥
असे मीचि सर्वस्व हे जाणतो तो ।
परावी गती मी असे ओळखीतो ॥ १८ ॥

बहूजन्म घेतां अखेरीस त्यासी ।
घडे पूर्णता येइ तो मत्पदासी ॥
रहातो सदा वासुदेवी सुचित्त ।
महात्मा असा जाण होतो क्वचीत ॥ १९ ॥

बहू कामना मोह ज्या पीडिताती ।
दुजा दैवतांते भजू लागताती ॥
स्वभावा धरूनी नि नाना तऱ्हांनी ।
विधी पाळिती ते प्रयत्ना करूनी ॥ २० ॥

सकामी असा जो जया देवतांते ।
करू पाहतो जाण आराधनेते ॥
तिथे भावना स्थीर मीची करीतो ।
तशी भावभक्ती तया मीच देतो ॥ २१ ॥

पुढे ते जया कामनेते धरीती ।
तशी दैवते ते भजू लागताती ॥
फळें प्राप्त होतात जी त्यातुनीया ।
तया मीच ठेवीतसे नेमुनीया ॥ २२ ॥

अशांना फळें तीं जरी मीळताती ।
तरी अल्प काळात तीं नासताती ॥
गतीही तथासी तया देवतांची ।
परी भक्त माझा मिळे तो मलाची ॥ २३ ॥

कळेनाच अज्ञास या श्रेष्ठ मी हें ।
सत्‌चित्‌ स्वरूपास कोणी न पाहे ॥
मला निर्गुणासी सगूणत्व देती ।
मला मानवासारखे मानिताती ॥ २४ ॥

स्वरूपास माझ्याच प्रत्यक्ष राया ।
पहा झाकुनी टाकिते योगमाया ॥
मला जन्म नाही नि मृत्यूहि नाही ।
परी मूढ लोका कळेना मुळीही ॥ २५ ॥

जसे भूतकाळी तसे वर्तमानी ।
भविष्यात होतील जे सर्व प्राणी ॥
अशा प्राणिमात्रास मी जाणताहे ।
परीही मला मात्र कोणी न पाहे ॥ २६ ॥

पहा द्वेष इच्छा अशापासुनीही ।
सुखासी नि दुःखासिही जन्म येई ॥
तयाने पहा मोह ते पावताती ।
तसेची तयाने पहा भ्रांत होती ॥ २७ ॥

परी पुण्य कर्मेंच केलीं जयांनी ।
तरी नष्ट पापेंच केलीं तयांनी ॥
तसे द्वंद्व मोहातुनी दूर होती ।
तसे निश्चयाने मला पूजिताती ॥ २८ ॥

पुनर्जन्म फेरा चुकावा म्हणूनी ।
झटे जो मला आसराची धरूनी ॥
परब्रह्म नी कर्मही जाणतो तो ।
तसेचीहि अध्यात्म तो ओळखीतो ॥ २९ ॥

अधीदेव तैसा अधीयज्ञ जाण ।
तसे ओळखी तो अधी भूतपूर्ण ॥
तसा तो सदा दक्ष योगी रहातो ।
प्रयाणी क्षणीही मला आठवीतो ॥ ३० ॥

* * *

सखा मी जगाचा तरी अज्ञ नेणे ।
परी जाणती पूजिती ते शहाणे ॥
असे सात अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

# अध्याय आठवा

# अक्षरब्रह्मयोग

अर्जुन म्हणाला

कसें काय तें ब्रह्म ध्यानात ध्यावें ।
कसें काय अध्यात्म तें ओळखावें ।।
अधीभूत नी कर्म कैसे असें तें ।
अधीदेव तो कोण हें सांग माते ।। १ ।।

अधीयज्ञ देवा कसा कोण होतो ।
तसा तोच देहात कैसा रहातो ।।
मनोनिग्रहाने जगी जे रहाती ।
प्रयाणी तुम्हाला कसे आठवीती ।। २ ।।

श्रीभगवान म्हणाले

अवीनाश नी श्रेष्ठ ते ब्रह्मतत्त्व ।
तसाचीहि अध्यात्म तो जीवभाव ।।
जगी भूतमात्रास उत्पत्ति राही ।
असा सृष्टि व्यापार तें कर्म होई ।। ३ ।।

अधीभूत तेची जयाचा विनाश ।
अधीदेव जो देहि राही पुरूष[1] ।।
अधीयज्ञही[2] मीच देही असून ।
तिथे देह कर्मात उत्साह जाण ।। ४ ।।

---

१ सचेतन अधिष्ठाता. २ सर्व यज्ञांचा अधिपति.

स्मरूनी मला जाण जो देह ठेवी ।
चुके जन्म फेरी तयाची गणावी ॥
स्वरूपास माझ्या मिळे निश्चयाने ।
खरा तो असे थोर निःसंशयाने ॥ ५ ॥

तसा शेवटी जो जिथे भाव ठेवी ।
तयासी गतीही तिथेची गणावी ॥
सदा जो कुणी ज्यास चिंतीत राही ।
तया अंतकाळी गती तीच राही ॥ ६ ॥

म्हणूनी मला तू अखंड स्मरावें ।
तसे युद्धही कुंतिपुत्रा करावें ॥
मनासी नि बुद्धीसिही अर्पि माते ।
तरी पावसी जाण माझ्या पदाते ॥ ७ ॥

सदभ्यास योगे मना आवरावें ।
तसे तें स्थिरावून ध्यानी भरावें ॥
पुढे तेंचि ब्रह्मातही लीन होते ।
दुजाभाव काही उरेना तयाते ॥ ८ ॥

असे सर्व धाता[1] अणूही परौता ।
अनादी असूनी जगाचा विधाता ॥
रवी सारखें तेज ज्याचें सदाही ।
अशा त्या अचिंत्यास चिंतून राही ॥ ९ ॥

---

१ आधार

प्रभू जो तया भक्ति भावे भजूनी ।
सदा संस्मरूनी मना आवरूनी ॥
असा योग साधूनि प्राणा निरोधी ।
तरी शेवटी तो परंधाम साधी ॥ १० ॥
अवीनाश ज्या वेदवेत्तेहि गाती ।
यती वीतरागी[1] जिथे लीन होती ॥
मुमुक्षू सदा ब्रह्मचर्येचि राही ।
तुला सांगतो त्या पदा ध्यान देई ॥ ११ ॥
पहा इंद्रियें जो पुरी रोधुनीया ।
करी स्थीरची अंतरंगी मनाया ॥
तसा मस्तकी प्राण स्थापीतसे तो ।
अशा जो समाधीतची स्थीर होतो ॥ १२ ॥
समाधीत स्थीरावुनी ॐ जपूनी ।
सदा जो रहातो मलाची स्मरुनी ॥
अशा या अवस्थेत जो देह ठेवी ।
तयासी गती मत्पदाची गणावी ॥ १३ ॥
सदा जो अनन्ये मला चिंतिताहे ।
तसे जो स्मरूनी मला नित्य राहे ॥
अशा भक्ति भावात जो योगि राही ।
तरी मत्पदा तो सुखानेच येई ॥ १४ ॥

---

१ विरक्त

जयांनी असे मत्पदा मेळवीले ।
पराा सिद्धिलागी तसे जे मिळाले ॥
अशा त्या महात्म्यांस निःसंशयेही ।
विनाशी नि दुःखी पुनर्जन्म नाही ॥ १५ ॥

परी ब्रह्मलोकादिकालागि जाती ।
तरी तेथुनीही पुनर्जन्म घेती ॥
जयांनी परी मत्पदा मेळवीलें ।
तयासी पुनर्जन्म ना बोलियेले ॥ १६ ॥

हजारो युगेची जई होत पूर्ण ।
तई ब्रह्मदेवास तो एक दीन ॥
पुन्हा तेवढा काळ रात्रीस जातो ।
असे काळवेत्ता पुरे ओळखीतो ॥ १७ ॥

जई ह्या दिनालागि सुरूवात होते ।
तई व्यक्त हें विश्व मायेत येतें ॥
जया वेळि रात्रीस सुरुवात होई ।
लयासी तया वेळि मायेत जाई ॥ १८ ॥

पुन्हा त्या दिनी तें पुन्हा व्यक्त होतें ।
पुन्हा तें लयातेहि रात्रीस जातें ॥
पराधीन तें होय या कारणाने ।
असे व्यक्त अव्यक्त भावे रहाणें ॥ १९ ॥

परी थोर जे तत्व मायेहुनीही ।
तयासी कधीही मुळी नाश नाही ॥
जरी सर्व हें विश्वही नाश पावें ।
तरी तें अवीनाश राही स्वभावे ॥ २० ॥

जें नाम ॐकार ब्रह्मा धरूनी ।
परावी गती तीच घे ओळखूनी ॥
फिरेना तिथूनी कधीही कुणीही ।
परंधाम माझें असें तेंच पाही ॥ २१ ॥

जया अंतरी सर्व जीवासि थारा ।
जयाने पहा व्यापिला हा पसारा ॥
अशा थोर देवा अनन्ये भजावें ।
तरी तो पहा प्रीतिने त्यास पावे ॥ २२ ॥

कुणा योगियाना पुनर्जन्म नाही ।
तसाची कुणाला पुन्हा जन्म येई ॥
अशी मृत्युची वेळ जी योगियांची ।
तुला सांगतो ऐक बा सव्यसाची ॥ २३ ॥

प्रकाशात अग्नीत तैसा दिनात ।
तसा शुक्ल पक्षात उत्तरायनात ॥
अशी वेळ साधे जया योगियासी ।
तयासी गती जाण माझ्या पदासी ॥ २४ ॥

धुरातून रात्री तसा कृष्णपक्षी ।
सहा मास दक्षणायनाचे सुलक्षी ॥
असा योगि तो चंद्रलोकासि जाई ।
परीही तिथूनी पुन्हा जन्म घेई ॥ २५ ॥

द्विधा मार्ग काळोख आणि प्रकाश ।
जगी हें अनादीच आहे विशेष ॥
प्रकाशामुळे जाण जन्मा चुकावें ।
परी जन्म घेण्यास काळोख लावे ॥ २६ ॥

असे योगि जो हें पुरें ओळखीतो ।
तयाचा पुरा मोह तो दूर होतो ॥
म्हणोनी तुवाही सदा सर्व भावे ।
असा योग साधूनि निश्चित व्हावें ॥ २७ ॥

तपातूनि वेदातुनी यज्ञ दानी ।
असें बोलिलें पुण्य शास्त्रीपुराणी ॥
तरी सर्व तें योगि लंघून जातो ।
परंधाम माझें सख्या मेळवीतो ॥ २८ ॥

* * *

मला सर्वदाची स्मरूनी रहावें ।
तसे युद्धही पार्थराया करावें ॥
असे आठ अध्याय संपूर्ण झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

अध्याय नववा

# राजविद्याराजगुह्ययोग

श्रीभगवान म्हणाले

तुला सांगतो थोरलें गूढ जाण ।
खरा शुद्ध आहेस पार्था म्हणून ॥
असें ज्ञान विज्ञान जाणून घेई ।
पुरे जाणलीया अती हीत होई ॥ १ ॥

पहा ज्ञान हें थोर कल्याणकारी ।
अवीनाश नी शुद्ध तैसेच भारी ॥
तसाचीहि हा मार्ग सोपा म्हणून ।
करावा सुखानेच आचार जाण ॥ २ ॥

अशा ज्ञानधर्मी जया भक्ति नाही ।
तयासी पहा भेट माझी न होई ॥
तसेची पहा मृत्यु संसार त्यांना ।
पुनर्जन्म फेरा कदापी चुकेना ॥ ३ ॥

पहा मीच अव्यक्त रूपे जगा या ।
असे व्यापुनी राहिलो पार्थराया ॥
जरी सर्व हें विश्व माझ्यात राही ।
तरी मी नसे त्यात जाणून घेई ॥ ४ ॥

परी तेंहि माझ्यामधे नाहि जाण ।
असा योग अद्‌भूत घे ओळखून ।।
उभारी नि पाळी जरी विश्व सारें ।
तरी मी नसे त्यात कोण्या प्रकारे ।। ५ ।।

नभी हा महा वायु जन्मास येई ।
करी व्याप आणीक तेथेच राही ।।
तशी सर्व भूतेंहि माझ्या ठिकाणी ।
रहातात्ति हें सर्व घे ओळखूनी ।। ६ ।।

तशी तीच भूतेंहि कल्पान्त काळी ।
लयासी पहा जाति मायेत सारी ।।
पुन्हा कल्प आरंभ होईल जेव्हा ।
पुन्हा घालितो मीच जन्मास तेव्हा ।। ७ ।।

पुन्हा आसरा मी निसर्गात घेतो ।
पुन्हा प्राणिमात्रास मी जन्मवीतो ।।
पराधीनता भूतसंघात आहे ।
तिच्या तो म्हणूनीच आधीन राहे ।। ८ ।।

अशीं मीच कर्में जरी चालवीतो ।
तरी बंधनी मी कधी ना रहातो ।।
सदा मीच कर्मी उदासीन राही ।
तयाची मला काहि आसक्ति नाही ।। ९ ।।

अधिष्ठान माझेच मायेस आहे ।
तरी त्यामुळे ती जगा निर्मिताहे ॥
चर स्थीर हें विश्व त्या कारणाने ।
अशी ही घडामोड चाले तयाने ॥ १० ॥

पहा सर्व जीवास मी वंद्य मान ।
महा ईश मी सर्व जीवा असून ॥
परी मानवी देह मी घेतलीया ।
अवज्ञा करीती मला नेणुनीया ॥ ११ ॥

असे मूढ आसूरि भावा धरीती ।
तरी त्यामुळे मोह ते पावताती ॥
पहा कर्म आणी तसे ज्ञानही तें ।
असूनीहि त्यांचें पुढे व्यर्थ होतें ॥ १२ ॥

परी अर्जुना जाण दैवी स्वभावा ।
धरूनी करीतात माझीच सेवा ॥
अवीनाश नी आदिस्थानी मला ते ।
पुरे जाणुनी पूजिती मत्पदाते ॥ १३ ॥

मनोनिग्रहासी पहा आचरूनी ।
तसे शुद्ध चित्तेच भक्ती करूनी ॥
सदा नाम संकीर्तनी गूण गाती ।
तसे वंदुनीही मला पूजिताती ॥ १४ ॥

दुजे ज्ञानयोगी विवेके रहाती ।
अभेदत्वतेने मला पूजिताती ॥
किती एक ते भिन्न रूपी पहाती ।
विराट स्वरूपात रंगून जाती ॥ १५ ॥

पहा यज्ञ वस्तूतही मीच आहे ।
तसा औषधी आणि मंत्रात राहे ॥
तसा तूप अग्नीहि होमात मीचो ।
तशा हव्य वस्तूहि मानी मलाची ॥ १६ ॥

जगा माय नी बाप मीची असून ।
तसाचीहि आजा असे मीच जाण ॥
तया सर्व आधार माझाच आहे ।
तिन्ही वेद ॐकारही मीच पाहे ॥ १७ ॥

सखा आणि साक्षी प्रभू सर्व जीवा ।
तसा स्वामि आधारही मीच सर्वा ॥
गती मी स्थिती मी नि आरंभही मी ।
जगा अव्ययी बीज तेही असे मी ॥ १८ ॥

रवी मीच होतो जगा तापवीतो ।
करूनीहि वृष्टी पुन्हा शांतवीतो ॥
तसा मोक्ष मृत्यूहि मी पार्थराया ।
तसे मी परब्रह्म नी मीच माया ॥ १९ ॥

अधिष्ठान माझेच मायेस आहे ।
तरी त्यामुळे ती जगा निर्मिताहे ॥
चर स्थीर हें विश्व त्या कारणाने ।
अशी ही घडामोड चाले तयाने ॥ १० ॥

पहा सर्व जीवास मी वंद्य मान ।
महा ईश मी सर्व जीवा असून ॥
परी मानवी देह मी घेतलीया ।
अवज्ञा करीती मला नेणुनीया ॥ ११ ॥

असे मूढ आसूरि भावा धरीती ।
तरी त्यामुळे मोह ते पावताती ॥
पहा कर्म आणी तसे ज्ञानही तें ।
असूनीहि त्यांचें पुढे व्यर्थ होतें ॥ १२ ॥

परी अर्जुना जाण दैवी स्वभावा ।
धरूनी करीतात माझीच सेवा ॥
अवीनाश नी आदिस्थानी मला ते ।
पुरे जाणुनी पूजिती मत्पदाते ॥ १३ ॥

मनोनिग्रहासी पहा आचरूनी ।
तसे शुद्ध चित्तेच भक्ती करूनी ॥
सदा नाम संकीर्तनी गूण गाती ।
तसे वंदुनीही मला पूजिताती ॥ १४ ॥

दुजे ज्ञानयोगी विवेके रहाती ।
अभेदत्वतेने मला पूजिताती ॥
किती एक ते भिन्न रूपी पहाती ।
विराट स्वरूपात रंगून जाती ॥ १५ ॥

पहा यज्ञ वस्तूतही मीच आहे ।
तसा औषधी आणि मंत्रात राहे ॥
तसा तूप अग्नीहि होमात मीचा ।
तशा हव्य वस्तूहि मानी मलाची ॥ १६ ॥

जगा माय नी बाप मीची असून ।
तसाचीहि आजा असे मीच जाण ॥
तया सर्व आधार माझाच आहे ।
तिन्ही वेद ॐकारही मीच पाहे ॥ १७ ॥

सखा आणि साक्षी प्रभू सर्व जीवा ।
तसा स्वामि आधारही मीच सर्वा ॥
गती मी स्थिती मी नि आरंभही मी ।
जगा अव्ययी बीज तेही असे मी ॥ १८ ॥

रवी मीच होतो जगा तापवीतो ।
करूनीहि वृष्टी पुन्हा शांतवीतो ॥
तसा मोक्ष मृत्यूहि मी पार्थराया ।
तसे मी परब्रह्म नी मीच माया ॥ १९ ॥

विधीनेहि जे काम्य कर्मे करूनी ।
तसे सोमही यज्ञयागी पिऊनी ॥
असे पुण्य साधूनि स्वर्गासि जाती ।
तिथे इंद्रलोकी सुखे भोगताती ॥ २० ॥

परी नाश पुण्यास स्वर्गा मुकावें ।
पुन्हा मृत्युलोकात जन्मास यावें ॥
अशा येरझारा अशा कामनांना ।
करू लागताती अशा या जनांना ॥२१ ॥

परी जे अनन्ये मला चिंतिताती ।
सदा प्रेमभावे मला पूजिताती ॥
अशा भक्त लोकांस मी उद्धरीतो ।
तसा योग नी क्षेमही चालवीतो ॥ २२ ॥

परी जे दुजी दैवते पूजिताती ।
तयांचीच भक्तीहि जे चालवीती ॥
तरी ती तशी भक्ति माझीच होते ।
परी योग्य मार्गा बुडाले पहा ते ॥ २३ ॥

पहा सर्व यज्ञात भोक्ता असे मी ।
फलाचाहि दाता तसाची प्रभू मी ॥
परी ते यथार्थे मला नेणताती ।
म्हणूनी अधःपात ते पावताती ॥ २४ ॥

भजे दैवता त्या गती दैवलोका ।
भजे पीतरा त्या गती पितृलोका ॥
भजे भक्त भूतां गती त्यास भूती ।
परी भक्त माझे मला मीळताती ॥ २५ ॥

मला भक्त माझा फळें फूल पान ।
अखेरीस पाणीहि भक्ती धरून ॥
समर्पीतसे प्रेम भावे करूनी ।
म्हणूनी मला प्रीय तो पुण्यखाणी ॥ २६ ॥

तरी तूहि जीं सर्व कर्मैं करीशी ।
तसे अन्न खासी नि होमा यजीसी ॥
तसे दान देशी तपा आचरीसी ।
मला सर्व अर्पी सख्या पुण्यराशी ॥ २७ ॥

असे केलिया कर्म बंधास तोडी ।
अशूभा शुभांच्या फलातूनि सोडी ॥
फलत्याग योगे पहा मुक्त होसी ।
खऱ्या भावनेने मला मेळवीसी ॥ २८ ॥

मला जीव सारे जगी या समान ।
मला प्रीय अप्रीय नाहीच कोण ॥
परी भक्तिने जे मला पूजिताती ।
तयांच्यात मी तेहि माझ्यात होती ॥ २९ ॥

जरी कोणि भारी दुराचारि झाला ।
परी एक भावेच मद्भक्त झाला ॥
तरीही तया लागि साधू म्हणावें ।
सदाचारि ऐसे तयासी गणावें ॥ ३० ॥

असा भक्तही शीघ्र मत्चित्त होतो ।
अवीनाश शांतीहि तो मेळवीतो ॥
खरा भक्त माझाच निश्चीत तोही ।
कधी दुर्गतीही तया लागि नाही ॥ ३१ ॥

मला आसरा जे धरूनी रहाती ।
स्त्रिया वैश्य नी शूद्रही मुक्त होती ॥
जरी पाप योनीत जन्मास आले ।
तरी तेहि पार्था मलाची मिळाले ॥ ३२ ॥

तिथे भक्त क्षत्रीय अन् ब्राह्मणासी ।
सुखानेच येणें घडे मत्पदासी ॥
जरी मृत्युलोकात जन्मास यावें ।
तरी पार्थराया मलाची भजावें ॥ ३३ ॥

म्हणूनी मनालागि माझ्यात ठेवी ।
तशी माझि पूजा नि भक्ती करावी ॥
नमूनी सदा चित्त अर्पी मला ते ।
तरी पावसी तूहि माझ्या पदाते ॥ ३४ ॥

* * *

जरी का दुराचारि मद्भक्त झाला ।
तरी दुर्गतीही मिळेना तयाला ॥
असे हे नऊ येथ अध्याय झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥



अध्याय दहावा

# विभूतियोग

श्रीभगवान म्हणाले

पुन्हा सांगतो गोष्ट भारी हिताची ।
तशी तूहि ऐकून घे सव्यसाची ॥
पहा बोध माझा तुला तोष देई ।
म्हणूनी मला फार आनंद होई ॥ १ ॥

महर्षी तसे देवतांच्या गणांना ।
उत्पत्ति माझी कशी तें कळेना ॥
अनादी नि मी मूळ त्यांचें म्हणून ।
तयांना नसे ज्ञान हें पूर्ण जाण ॥ २ ॥

पहा मी अजन्मा अनादीहि आहे ।
तसाचीहि लोकी अति श्रेष्ठ राहे ॥
असे जाणतो तोच निर्मोह होई ।
तसा मुक्त पापादिकातून पाही ॥ ३ ॥

पहा ज्ञान बुद्धी नि निर्मोहता ती ।
तसे सत्य नी निग्रहासी धरीती ॥
तसा लाभहानी नि भीरुत्व तेही ।
तसे जन्म मृत्यू नि दुःखा सुखाही ॥ ४ ॥

असंतोष संतोष दातृत्वताःही ।
अहिंसा क्षमा नी तपस्याहिः राही ॥
अशा जीवभावास माझ्यातुनीया ।
असे जन्म यासी सख्या पार्थराया ॥ ५ ॥

मनू चार प्राचीन काळात होते ।
महर्षी पहा सात तैसेचही ते ॥
असे हे ऋषी मीच संकल्पिलेले ।
तया पासुनी सर्व हे लोक झाले ॥ ६ ॥

विभूती पहा माझि ऐश्वर्यरूप ।
तशी योगशक्तीहि मोठी अमाप ॥
यथार्थत्वतेनेच जो ओळखीतो ।
मला तोच निःसंशये मेळवीतो ॥ ७ ॥

पहा मीच सृष्टीस या मूळ आहे ।
तशी प्रेरणा तीस माझीच राहे ॥
असे जे शहाणे पुरे ओळखीती ।
मला भक्तिने ते भजूनी रहाती ॥ ८ ॥

मनें आणि प्राणेहि ते मीच होती ।
तसा बोधही एकमेका करीती ॥
सदा जाण माझ्या गुणा वर्णिताती ।
अती प्रेमभावात रंगून जाती ॥ ९ ॥

सदा सर्वदा जाण भक्ती धरूनी ।
रहाती अतिप्रेम भावे भजूनी ॥
तयांना पहा बुद्धियोगास देतो ।
तसेची तया मत्पदा मेळवीतो ॥ १० ॥

तयांच्यावरी जाण प्रीती करूनी ।
तयांच्याच चित्तात राहे भरूनी ॥
पुढे ज्ञानदीपास मी चेतवीतो ।
तसे अंध अज्ञान मी घालवीतो ॥ ११ ॥

अर्जुन म्हणाला

परब्रह्म तुम्ही पुराणे पुरूष ।
अवीनाश तैसे अनादी परेष ॥
तुम्हीचि विभूती अजन्मा खरेंची ।
तुम्ही शुद्ध नी दिव्य आहा तसेची ॥ १२ ॥

असेची ऋषी मंडळी सांगताती ।
असे देवलादी असीतादि गाती ॥
तसे व्यास आणीक देवर्षि तेही ।
तसेची मला सांगता ते तुम्हीही ॥ १३ ॥

अनंती तुम्ही सांगता सत्यही तें ।
मलाही प्रभो मान्य आहे तसे तें ॥
तुम्हांला खरेंची यथार्थत्वतेने ।
कुणी देव नी दानवामाजि नेणे ॥ १४ ॥

पुरूषोत्तमा आपल्याचि स्वरूपा ।
तुम्हांला तुम्ही जाणता पूर्ण बापा ॥
जगन्नाथ तुम्ही नि देवाधिदेव ।
तसे निर्मिते भूतमात्रादि भाव ॥ १५ ॥

मला आपल्या सांगता का विभूती ।
तयामाजि ज्या थोर नी दिव्य होती ॥
तयांच्या मुळे विश्व तुम्हीच सारें ।
कसें व्यापिलें आणि कोण्या प्रकारे ॥ १६ ॥

तुझें ध्यान देवा कसें म्या करावें ।
कसें योग योगेश्वरा ओळखावें ॥
कसें चित्तही त्या स्वरूपी भरावें ।
कसें चिंतनासी सदा चालवावें ॥ १७ ॥

पुन्हा आपल्या पूर्ण सांगा विभूती ।
कशी तीहि सांगा असे योगशक्ती ॥
तुम्ही बोलता ती असे गोड वाणी ।
म्हणूनीच तृप्ती न हो आयकूनी ॥ १८ ॥

श्रीभगवान म्हणाले

बरें सांगतो ऐक पार्था विभूती ।
जगी यात ज्या मुख्य नी दिव्य होती ॥
तसा अर्जुना अंत ज्यासी असेना ।
तयांचा न संपेहि विस्तार नाना ॥ १९ ॥

पहा अंतरी मी जिवांच्या रहातो ।
तिथे आत्मरूपेच वस्ती करीतो ॥
जगासी पहा मूळ नी मध्य तोही ।
तसेची असे अंतही मीच पाही ॥ २० ॥

अदीती सुपुत्रात विष्णूहि मीची ।
प्रकाशीत वस्तूत भानू तसाची ॥
मरीचीहि वायूमधे मीच आहे ।
शशी जाण तारांगणी मीच राहे ॥ २१ ॥

पहा मीच वेदामधे सामवेद ।
तसाचीहि देवांत इंद्र प्रसिद्ध ॥
पहा भूति चैतन्य मीची असूनी ।
मनासी तसे इंद्रियामाजि मानी ॥ २२ ॥

पहा यक्ष नी राक्षसीं मी कुबेर ।
तसा मीचि शैवी असे जाण रुद्र ॥
तसे पावकासी गणावें वसूंत ।
तसे जाण मेरूसही पर्वतांत ॥ २३ ॥

पुरोहीत वर्गामधे मी गुरूची ।
असे जाण स्वर्गामधे मुख्य तोची ॥
असे स्कंध सेनानिमाजी चतूर ।
जलांच्याहि राशीत पाही समुद्र ॥ २४ ॥

असे मीचि ॐकार या वाणिमाजी ।
  भृगूही असे मी महर्षीत गाजी ॥
जपालाच यज्ञात श्रेष्ठत्व आहे ।
  हिमाद्रीच मी स्थावरामाजि राहे ॥ २५ ॥

असे मीच वृक्षात अश्वत्थ जाण ।
  तसा नारदासीहि देवर्षि मान ॥
असे चित्रगंधर्वची मीच आणी ।
  मुनी त्या कपीलास सिद्धात मानी ॥ २६ ॥

पहा मीच अश्वात उच्चैःश्रवाची ।
  समुद्रास मंथून आलोहि मीची ॥
गजेंद्रात ऐरावतासी गणावें ।
  नरांच्यात राजा असें ओळखावें ॥ २७ ॥

तसे कामधेनूस गाईत जाण ।
  असे थोर मी वज्र शस्त्रांमधून ॥
प्रजोत्पत्ति हेतूत मी काम आहे ।
  तसा वासुकी मीच सर्पांत राहे ॥ २८ ॥

तसा मीच नागांमध्ये शेष जाण ।
  जळी देव नाही वरूणासमान ॥
असे अर्यमा मीच पित्रांमध्येही ।
  यमाला पहा शासकी मानतीही ॥ २९ ॥

पहा मीच प्रल्हाद दैत्यामधेची ।
तसा ग्रासणारा मधेकाळ मीची ॥
पशूंच्यामधे मी असे सिंह जाण ।
तसा नाहि पक्षी गरूडासमान ॥ ३० ॥

पहा वेगवानात वायू असूनी ।
तसे शस्त्रधाऱ्यात श्रीराम मानी ॥
मला नक्र मत्स्यांतची ओळखावें ।
नद्यांच्यात भागीरथीसी गणावें ॥ ३१ ॥

पहा सृष्टि मीची मुळापासुनीया ।
तसा मध्य नी अंत मी पार्थराया ॥
म्हणावेंच विद्येत अध्यात्म विद्या ।
असे मीच की वाद तात्वीकवाद्या ॥ ३२ ॥

समासामध्ये द्वंद मीची असूनी ।
अकारासही अक्षरा मीच मानी ॥
असे अक्षयी काळही मीच पार्था ।
विराट स्वरूपी असे मीच धाता ॥ ३३ ॥

पहा मृत्यु मीची असे सर्व हर्ता ।
तसा जन्मही मीच होणार भूता ॥
स्त्रियाधर्मि वाणी स्मृती श्री नि कीर्ती ।
तशा त्या क्षमा नी धृती जाण होती ॥ ३४ ॥

बृहत्साम हे स्तोत्र मी सामवेदी ।
   तसा मीच गायत्रि हा मंत्र छंदी ॥
तसे मार्गशीर्षास मासात जाण ।
   ऋतू माजि नाही वसंतासमान ॥ ३५ ॥

असे द्यूत मी जे जुगाऱ्यात साजे ।
   तसें तेज मी शूर लोकी वसे जे ॥
जयश्री तसा निश्चयो मीच आहे ।
   तसे सत्व मी सात्विकी राहताहे ॥ ३६ ॥

असे यादवामाजि मी वासुदेव ।
   तसा पार्थ मी थोर ज्याचा प्रभाव ॥
मुनींच्यामध्ये व्यास ते जाण मीची ।
   कवीमाजि शुक्रास मानी तसेंची ॥ ३७ ॥

असे दंड[1] मी दंडकर्ता करी जे ।
   तसाची जयेच्छूत मी धर्म गाजे ॥
असे ज्ञानियांचेंहि मी होय ज्ञान ।
   तसे गुप्त गोष्टीत मी होय मौन ॥ ३८ ॥

पहा बीज मी जाण साऱ्या जगाचें ।
   असें अर्जुना जाण तू पूर्ण साचे ॥
चरस्थीर भूती मला सोडुनीया ।
   दुजे काहि नाही सख्या पार्थराया ॥ ३९ ॥

---

१ दमन करण्याची शक्ति

अशा दिव्य माझ्या विभूती अनंत ।
तया पार नाही मुळी या जगात ॥
तयांचाच विस्तार बा पार्थराया ।
तुला बोलिलो थोडकाची कळाया ॥ ४० ॥

असे वस्तु ऐश्वर्यसंपन्न जाण ।
दिसे शक्तियुक्ती नि शोभायमान ॥
असे सत्त्वगूणी नि कान्ती तशीची ।
रहातोच तेजांश माझा तिथेची ॥ ४१ ॥

पहा हे तुला सर्व काही कळाया ।
किती शीण देऊ तुला पार्थराया ॥
पहा एक अंशात साऱ्या जगासी ।
असे व्यापुनी ऊरलो पुण्यराशी ॥ ४२ ॥

* * *

इथे दिव्य नी मुख्य ऐशा विभूती ।
तसे विश्वची मी असें सांगताती ॥
असे हे दहा पूर्ण अध्याय झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

### अध्याय अकरावा

# विश्वरूपदर्शनयोग

अर्जुन म्हणाला

कृपाळूपणाने मला देवराया ।
बहू बोध केला तुम्ही मोह जाया ॥
दिली गूढ अध्यात्म विद्याहि भारी ।
तिने मीहि निर्मोह झालो मुरारी ॥ १ ॥

असे जन्म नी नाश निश्चीत भूता ।
तसेची खरें ऐकिलें मी समर्था ॥
असे सर्व माहात्म्य हे देवराया ।
प्रभो तें कळालें तुम्हापासुनीया ॥ २ ॥

तुम्ही हें मला ज्ञान जें ऐकवीलें ।
यथार्थे मला तें कळूनीहि आलें ॥
परी ईश्वरी रूप तें दाखवावें ।
मला तेचि प्रत्यक्ष वाटे पहावें ॥ ३ ॥

प्रभो तूमच्या त्या स्वरूपप्रभावा ।
पहाण्यास मी योग्य हो काय देवा ॥
तसे वाटलीया प्रभो विश्वरूपा ।
मला दाखवावें तुम्ही स्वस्वरूपा ॥ ४ ॥

श्रीभगवान म्हणाले

पहा शेकडो नी हजारो अशीही ।
अती दिव्य रुपेंच पाहून घेई ॥
अनेक प्रकाराचि रंगाचि तींही ।
अलौकीक तैशीच ती सर्व पाही ॥ ५ ॥

पहा रुद्र आदित्य नी अश्विनीही ।
वसू आणि वासूहि पाहून घेई ॥
अती भारि आश्चर्यकारी जहालीं ।
कुणीही कधीही नसे पाहिलेलीं ॥ ६ ॥

चरस्थीर हें विश्व आता इथेची ।
पहा देहि एकत्र ते सव्यसाची ॥
सख्या पार्थ राया पहा आणखीही ।
हवें जें तुला तेंहि पाहून घेई ॥ ७ ॥

परीही तुला चर्मचक्षूमुळे हें ।
दिसावें कसें तें असें वाटताहे ॥
म्हणूनी तुला दिव्य दृष्टीस देतो ।
पहा ईश्वरी योग माझा कसा तो ॥ ८ ॥

संजय म्हणाला

नृपा श्रेष्ठ योगेश्वरे त्या प्रभूनी ।
तयावेळि पार्थास ऐसें म्हणूनी ॥
महाथोर ऐश्वर्यसंपन्न झाले ।
अती दिव्य रूपासि त्या दाखविलें ॥ ९ ॥

अलंकार त्यासी बहू दिव्य पाही ।
तशी सज्ज हातात दिव्यायुधें हीं ॥
असंख्यात डोळे मुखेंही अनेक ।
अशी दर्शनें भारि अद्भूत देख ॥ १० ॥

तया दिव्य वस्त्रें फुलेंही तशीच ।
तसे गंधही लेपुनी भव्य साच ॥
अती भारि आश्चर्य वाटे मनाला ।
कसे सर्वही व्यापुनी विश्व झाला ॥ ११ ॥

हजारो रवींची प्रभा एक झाली ।
जरी तीचि एकत्र फाकोनि आली ॥
तरी ईश्वराच्या प्रभे सारखी ती ।
तुळेना मुळीही कशीही पहा ती ॥ १२ ॥

अनेक प्रकारे निराळे असूनी ।
अशा त्या जगालागि एके ठिकाणी ॥
प्रभूच्या शरीरात सामावलेलें ।
असें रूप तें पांडवे देखियेलें ॥ १३ ॥

असें पाहुनी पार्थ विस्मीत झाला ।
तसे रोम अंगी बहू दाटलेला ॥
नमस्कार साष्टांगही घालुनीया ।
पुढे बोलिला पार्थ तें ऐक राया ॥ १४ ॥

अर्जुन म्हणाला

प्रभो ईश्वरा तूमच्या या शरीरी ।
बहू दिव्य भूतें तसे सर्प भारी ॥
दिसेचीहि पद्मासनी ब्रह्मदेव ।
ऋषी नी सदाशीव नी देव सर्व ॥ १५ ॥

तुम्हांला मुखे नेत्र बाहू बहूत ।
तशी फार पोटें नि रूपें अनंत ॥
असे विश्वरूपीच झाला तुम्हीही ।
तुम्हा मध्य आदी तसा अंत नाही ॥ १६ ॥

गदा चक्रधारी शिरीही किरीट ।
दिसें तेज सर्वत्र भारी अफाट ॥
पहाण्या शकेना कुणीही तुम्हांला ।
जसा सूर्य तेजस्वि तैसेच झाला ॥ १७ ॥

परब्रह्म नी श्रेष्ठ आहा तुम्हीची ।
जगालागि आधारही तूमचाची ॥
तुम्ही धर्मही राखिता मूर्तिमंत ।
तसेची तुम्ही वाटते आदिनाथ ॥ १८ ॥

तसा अंत ना मध्य आदी असेना ।
शशीसूर्य-डोळे नि बाहूहि नाना ॥
तसे तप्त अग्नीप्रमाणे मुखेंही ।
तयाने पहा विश्व तापून जाई ॥ १९ ॥

तसे पृथ्वि आकाश दाही दिशा या ।
भरूनीहि गेल्या स्वरूपी कशा या ॥
अशा पाहुनी उग्र अद्‌भूत रूपा ।
तिन्ही लोक व्याकूळ झाले अमापा ॥ २० ॥

तसे देव सारे शिरूनी तुम्हात ।
भये कोणि गातात जोडोनि हात ॥
तुम्हा संत नी साधु मांगल्य गीते ।
समर्पूनिया आळवीती तुम्हाते ॥ २१ ॥

वसू साध्य विश्वें नि आदित्य रुद्र ।
तसे अश्विनी आणि वायू असूर ॥
तसे यक्ष-गंधर्वही नम्र होती ।
तुम्हा विस्मये सर्वही पाहताती ॥ २२ ॥

तसे रूप हें, घोर डोळे अपार ।
भुजा पाय ऊरू नि पोटेंहि फार ॥
मुखें अणि दाढाहि विक्राळ होती ।
तया दर्शने वाटते फार भीती ॥ २३ ॥

नभासीहि भेदून गेले भरूनी ।
तसे तप्त डोळे मुखे आ करूनी ॥
असे पाहुनीया नसे शांति जीवा ।
तुम्हा फार भ्यालो नसे धीर देवा ॥ २४ ॥

मुखे फार विक्राळ दाढा कराळ ।
दिसे अग्निकल्लोळ कल्पान्त काळ ॥
दिशाभूल झालो सुखी ना परेशा ।
प्रसन्ने पहा हो जगाच्या निवासा ॥ २५ ॥

कसे सर्व हेची कुरूचे सुपुत्र ।
तसेचीहि ते राजराजेश थोर ॥
तसे भीष्म हे द्रोण हा वीर कर्ण ।
तसे आमचे वीर ते थोर सान ॥ २६ ॥

कसे हे मुखातून हो शीरताती ।
मुखातील दाढाहि विक्राळ होती ॥
तसे दातही ते घुसूनी शिरात ।
शिरें चूर झाली अशी दीसतात ॥ २७ ॥

नद्यांचे असंख्यात जैसे जमाव ।
समुद्रात घेतात वेगेच धाव ॥
महावीर लोकाग्रणी धाव घेती ।
तसे पेटलेल्या मुखी शीरताती ॥ २८ ॥

जसे पेटत्या अग्निमध्ये पतंग ।
मरायासि जाती करूनीहि वेग ॥
महावीर तैसे बहू शीरतात ।
मरायास हे तूमच्या या मुखात ॥ २९ ॥

अशा पेटत्या या मुखांनी जनांना।
गिळूनीहि चाटीत आहा जिभांना ॥
प्रभा तूमच्या या अती तप्त होती।
अशा तप्त तेजे जगा तापवीती ॥ ३० ॥

तुम्ही कोण सांगा असे उग्ररूपी।
तुम्हा प्रार्थितो मी अतूल प्रतापी ॥
प्रभो आद्य तुम्ही परी तें कळेना।
प्रवृत्ती कशी तूमची आकळेना ॥ ३१ ॥

श्रीभगवान म्हणाले

महाकाळ संहारकर्ताच झालो।
इथे सर्व हे लोकनाशास आलो ॥
जरी तू इथे युद्ध हें टाळशील।
तरी मृत्यु यांना मुळी ना टळेल ॥ ३२ ॥

म्हणूनीच तू ऊठ जोडी यशाते।
पुरे घेइ हे राज्य जिंकी रिपूते ॥
पहा सर्व आधीच मी मारुनीया।
निमित्तास केले तुला पार्थराया ॥ ३३ ॥

महावीर द्रोणा तसे वीर कर्णा।
तसे भीष्म आजे नि साऱ्या जनांना ॥
पहा मारिले मी तयासीच मारी।
रणी सोड भीती जयश्रीच दारी ॥ ३४ ॥

पुढूनी नि मागूनि सर्वांकडूनी ।
नमस्कार तुम्हा जिथूनी तिथूनी ॥
असे शक्ति उत्साह तुम्हा अनंत ।
तुम्ही सर्व नी सर्व आहे तुम्हात ॥ ४० ॥

तुम्हा बोलिलो मित्रभावे करूनी ।
अरे यादवा रे सख्या रे म्हणूनी ॥
प्रभो योग्यता मी नसे जाणियेली ।
प्रमादे नि प्रेमे अशी चूक झाली ॥ ४१ ॥

विनोदार्थ चेष्टा करूनीहि भारी ।
तशीचीहि आहारि, तैशी विहारी ॥
अनेकात तैशीच एकांति तीही ।
क्षमा मागतो मी तुम्हा शेषशायी ॥ ४२ ॥

पिता तू जगाचा चराचा स्थिराचा ।
तसा पूज्य सर्वा गुरू थोर साचा ॥
त्रिलोकात तुम्हा नसे कोण जोडी ।
तसेची तुम्हाला नसे कोण जाडी ॥ ४३

करीतो नमस्कार साष्टांगभावे ।
प्रभो देवराया प्रसन्ने पहावे ॥
क्षमा याचितो मी समर्था तुम्हासी ।
जशी ती करावी पित्याने मुलासी ॥ ४४

संजय म्हणाला

असे ऐकुनी बोल त्या केशवाचे ।
भये धैर्य गेलें पहा अर्जुनाचें ॥
पुन्हा बोलिला वंदुनी देवराया ।
गळा दाटला भीतिने नम्र पाया ॥ ३५ ॥

अर्जुन म्हणाला

प्रभो तूमच्या नाम संकीर्तनाने ।
जगासीहि आनंद लोटे सुखाने ॥
तसे सिद्ध सारे तुम्हा वंदिताती ।
परी राक्षसांना सुटे फार भीती ॥ ३६ ॥
समस्तासि मोठे तुम्ही आदिनाथा ।
म्हणूनी तुम्हा वंदिती ते समर्था ॥
तुम्ही सत्य मिथ्या परौते अनंता ।
अवीनाश आहा तुम्ही आदिनाथा ॥ ३७ ॥
पुराणें तसेची तुम्ही आदिदेवा ।
तुम्ही पूर्ण आधार या सर्व विश्वा ॥
तुम्ही जाणते नी जगा व्यापुनीया ।
परंधाम तुम्हीच भो देवराया ॥ ३८ ॥
यमाग्नी नि वायू वरूणेंदु साचा ।
प्रजेचा धनी नी पिताही तयांचा ॥
हजारो नमस्कार तुम्हा अनंता ।
पुन्हाही पुन्हाही तुम्हा विश्वनाथा ॥ ३९ ॥

पुढूनी नि मागूनि सर्वांकडूनी ।
नमस्कार तुम्हा जिथूनी तिथूनी ॥
असे शक्ति उत्साह तुम्हा अनंत ।
तुम्ही सर्व नी सर्व आहे तुम्हात ॥ ४० ॥

तुम्हा बोलिलो मित्रभावे करूनी ।
अरे यादवा रे सख्या रे म्हणूनी ॥
प्रभो योग्यता मी नसे जाणियेली ।
प्रमादे नि प्रेमे अशी चूक झाली ॥ ४१ ॥

विनोदार्थ चेष्टा करूनीहि भारी ।
तशीचीहि आहारि, तैशी विहारी ॥
अनेकात तैशीच एकांति तीही ।
क्षमा मागतो मी तुम्हा शेषशायी ॥ ४२ ॥

पिता तू जगाचा चराचा स्थिराचा ।
तसा पूज्य सर्वा गुरू थोर साचा ॥
त्रिलोकात तुम्हा नसे कोण जोडी ।
तसेची तुम्हाला नसे कोण जाडी ॥ ४३ ॥

करीतो नमस्कार साष्टांगभावे ।
प्रभो देवराया प्रसन्ने पहावे ॥
क्षमा याचितो मी समर्था तुम्हासी ।
जशी ती करावी पित्याने मुलासी ॥ ४४ ॥

अलौकीक हें पाहुनी हर्ष झाला ।
परीही भये जीव व्याकूळ केला ॥
प्रभो मूळचें रूप तें दाखवावें ।
मला त्याविणे सूख कैसे मिळावे ॥ ४५ ॥

चतुर्भूज तैसे गदा चक्रधारी ।
असें रूप तें दाखवावें मुरारी ॥
पहाण्यास मी इच्छितो विश्वमूर्ते ।
हजारो मुखांचें नको हो मला तें ॥ ४६ ॥

श्रीभगवान म्हणाले

प्रसन्नेच मी आद्य या विश्वरूपा ।
तुला दाविले योगसामर्थ्य बापा ॥
असे थोर तेजोमयी रूप माझें ।
कधी कोणि पूर्वी नसे देखिले जें ॥ ४७ ॥

करूनीहि कर्में नि वेदा पढूनी ।
तसे दान यज्ञा तपा आचरूनी ॥
पहाण्या तुझ्यावीण या मत् स्वरूपा ।
दुजा कोणिही येथ नाहीच बापा ॥ ४८ ॥

असे घोर हें रूप तू पाहण्यासी ।
अशा मूढभावे असा का भितोसी ॥
भयाते मुळी सोड संतुष्ट होई ।
फिरूनी मला याच रूपात पाही ॥ ४९ ॥

मराठी ग्रंथ ... ठाणे
93406

संजय म्हणाला

असे अर्जुनालागि आश्वासिले ।
तयासी पुन्हा रूप तें दाखवीलें ॥
परी खिन्न होताच देऊनि धीर ।
पुन्हा सौम्य झाला पहा तो उदार ॥ ५० ॥

अर्जुन म्हणाला

प्रभो तूमच्या मानवी सौम्य रूपा ।
पहाताच आनंद झाला अमापा ॥
तसाचीहि भानावरी पूर्ण आलो ।
तसाची पहा पूर्ण संतुष्ट झालो ॥ ५१ ॥

श्रीभगवान म्हणाले

जसें पाहिलें तू तसें रूप जाण ।
कुणासीहि तें पाहण्यासी कठीण ॥
पहाण्या मिळावें म्हणूनी सदैव ।
करीतात इच्छा पहा सर्व देव ॥ ५२ ॥
तसा वेद अभ्यास साधून काही ।
तसे यज्ञ दाने तपेही कितीही ॥
जरी सर्व केलें तरी रूप माझें ।
दिसूही शकेनाच तू पाहिलें जें ॥ ५३ ॥
अनन्येच होऊन भक्ती करावी ।
मला पोचण्याची अपेक्षा धरावी ॥
तसेची मला जो खरे ओळखीतो ।
असा तो नि मीही पुरे एक होतो ॥ ५४ ॥

असा भक्त कर्में मला अर्पुनीया ।
जगी राहि निर्वैर जो पार्थराया ॥
तसाची मला जो अनन्ये पहातो ।
तसा निश्चयाने मला मेळवीतो ॥ ५५ ॥

★ ★ ★

इथे पार्थ त्या विश्वरूपा बघूनी ।
तदा विस्मये प्रार्थिले त्या नमूनी ॥
असे आकरा येथ अध्याय झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥



## अध्याय बारावा

# भक्तियोग

अर्जुन म्हणाला

असे जे अनन्येच भक्ती करूनी ।
सगूण स्वरूपी रहाती भजूनी ॥
कुणी निर्गुणी गोविती जे मनासी ।
अशातून मोठे म्हणावे कुणासी ॥ १ ॥

श्रीभगवान म्हणाले

मनाला सदा जाण माझ्या ठिकाणी ।
अति प्रेमभावे तया स्थीरवूनी ॥
सगूणी मला जे भजूनी रहाती ।
जगी थोर तेची मला वाटताती ॥ २ ॥

परी त्या अचिंत्यासही चिंतुनीया ।
रहाती सदा जे मुनी पार्थराया ॥
अनिर्वाच्य अव्यक्त साक्षी असे जे ।
अशा निर्गुणासी मना गोविती जे ॥ ३ ॥

समानत्व बुद्धी सदा ठेवुनीया ।
तशी इंद्रियेंही पुरी जिंकुनीया ॥
हितालागि भूतां सुदक्षे रहाती ।
असे ज्ञानिही ते मला पावताती ॥ ४ ॥

मनाला बहू ताप अव्यक्त बोधी ।
तया साधनी जाण भारी उपाधी ॥
सदेहात्मबुद्धी असे त्यामुळे ती ।
गती त्यास व्हाया बहू कष्ट होती ॥ ५ ॥

परी जे अनन्ये मला चिंतिताती ।
तशी सर्व कर्मे मला अर्पिताती ॥
सगूण स्वरूपी मला भाविताती ।
सदा भक्तिभावे भजूनी रहाती ॥ ६ ॥

असे भक्त कित्येक मच्चित्त झाले ।
भवाब्धीत सारे तरूनीहि गेले ॥
अशा भाविका मी त्वरे उद्धरीतो ।
पुनर्जन्म फेराहि मी चूकवीतो ॥ ७ ॥

म्हणूनी मनालागि माझ्यात ठेवी ।
तशी बुद्धी माझ्यात सुस्थीरवावी ॥
असे केलियाने पहा मुक्त होसी ।
तसे निश्चयाने मला मेळवीसी ॥ ८ ॥

असे चित्त माझ्यात सुस्थीरवाया ।
जरी शक्य तेंही नसे पार्थराया ॥
सदभ्यासयोगे पुढे शक्य होई ।
सदिच्छा धरूनी प्रयत्नात राही ॥ ९ ॥

जरी हो न अभ्यास तूझ्याकडूनी ।
तरी नित्य कर्मं मला दे स्मरूनी ॥
अशी सर्व कर्मं मला अर्पिशील ।
तरी पार्थराया मला पावशील ॥ १० ॥

जरी हेहि काही तुला साध्य नाही ।
तरी तू अनन्येच माझ्यात राही ॥
तसेचीहि कर्मी फलत्याग व्हाया ।
मना आवरूनी धरी पार्थराया ॥ ११ ॥

सदभ्यासपेक्षा असे ज्ञान श्रेष्ठ ।
परी ध्यान ज्ञानाहुनीही वरिष्ठ ॥
फलत्याग ध्यानापरी श्रेष्ठ साजे ।
फलत्यागयोगेच शांती विराजे ॥ १२ ॥

कुणाचाहि तो द्वेष पार्था करीना ।
दया प्रीति राखी नि माझे म्हणीना ॥
सुखासी नि दु:खासी मानी समाना ।
क्षमा आणि मैत्रीहि साऱ्या जनांना ॥ १३ ॥

सदोदीत संतुष्ट जो योगि राही ।
पुरा निश्चयी जो मनी संयमीही ॥
मनासी नि बुद्धीसि अर्पी मला तो ।
मला भक्त तोची बहू प्रीय होतो ॥ १४ ॥

जयापासुनी त्रास कोणा न होई ।
जनालागि तो ना कधी त्रास देई ॥
भय, क्रोध आणीक शोकासि नेणे ।
मला भक्त तोची बहू प्रीय जाणे ॥ १५ ॥

उदासीन पाही अपेक्षाहि नाही ।
नसें खेद काही शुचिर्भूत राही ॥
अभीमान कर्मात सोडून देतो ।
मला भक्त तोची बहू प्रीय होतो ॥ १६ ॥

जयासी कदा हर्ष ना द्वेष पाही ।
तसे दुःख आणीक इच्छाहि नाही ॥
शुभाशूभ गोष्टीस सोडून देतो ।
मला भक्त तोची बहू प्रीय होतो ॥ १७ ॥

पहा मित्र शत्रू जया सारखेची ।
तसाचीहि मानापमानी असेची ॥
जसे शीत उष्णी तसे दुःख सूखी ।
पहा सारखे मानि निःसंग देखी ॥ १८ ॥

स्तुती आणि निंदा जया सारखीची ।
मिळे तें करी गोड मौनी असेची ॥
मना स्थीर ठेवी नी निःसंग राही ।
मला भक्त तोची बहू प्रीय होई ॥ १९ ॥

अशा श्रेष्ठ धर्मात गोवी मनासी ।
सदा प्रेम भावा धरी पुण्यराशी ॥
भजूनी मला जो अनन्ये रहातो ।
मला भक्त तोची वहू प्रीय होतो ॥ २० ॥

* * *

सगूणी अनन्ये मला पूजिताती ।
तरी भक्त ते शीघ्रची मुक्त होती ॥
असे येथ अध्याय बारा जहाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

## अध्याय तेरावा

# क्षेत्रक्षेत्रज्ञयोग

श्रीभगवान म्हणाले

शरीरास या क्षेत्रही बोलताती ।
तसे तत्त्ववेत्तेहि ते मानताती ॥
असें क्षेत्र जाणोनि जो त्यात राही ।
तयालागि क्षेत्रज्ञ हें नाव येई ॥ १ ॥

अशा सर्व क्षेत्रीं पहा जो रहातो ।
सख्या पार्थराया असे मीचही तो ॥
तयाचेंहि तात्त्वीक जें होय ज्ञान ।
खरें ज्ञान तेंची असें मी म्हणीन ॥ २ ॥

पहा क्षेत्र कैसे असे पार्थराया ।
प्रकारा विकारास घे जाणुनीया ॥
तसाचीहि क्षेत्रज्ञ हा कोण तेही ।
प्रभावास त्याच्याहि जाणून घेई ॥ ३ ॥

असे जें तयांचेंहि तात्त्वीक ज्ञान ।
ऋषींनी पहा सर्व वेदांमधून ॥
तसे ब्रह्मसूत्रीहि निश्चीत केलें ।
पदातूनि छंदातुनी गाइयेले ॥ ४ ॥

पहा प्रकृती मूळ अव्यक्त आधी ।
तशी पांच भूतें अहंकार बुद्धी ॥
दहा इंद्रियांसी मनासी धरूनी ।
तसे वीषयासीहि त्या पांच मानी ॥ ५ ॥

तशी द्वेष इच्छा नि दुःखा सुखाही ।
धृती चेतना आणि संघात पाही ॥
अशा या विकारा मिळूनी जहाले ।
म्हणूनीच या क्षेत्र हें नांव आलें ॥ ६ ॥

नसे मान काही नसे दंभ पाही ।
अहिंसा क्षमाशील होऊन राही ॥
पवित्रे सदा आणि सेवा गुरूची ।
मनोनिग्रही आणि शांती तशीची ॥ ७ ॥

तशी वीषयातून राही विरक्ती ।
अहंकार तोही मुळी नाहि चित्ती ॥
जरा जन्म मृत्यू नि दुःखा धरूनी ।
तसे व्याधि हे सर्वही दोष मानी ॥ ८ ॥

अलिप्तत्व पुत्रादिकातून पाही ।
अनासक्त होऊनि कर्मात राही ॥
असोदे कशीही पहा लाभ हानी ।
सदोदीत चित्ती समाधान मानी ॥ ९ ॥

अनन्ये मनानेच माझ्या ठिकाणी ।
करी भक्ति निष्काम भावा धरूनीं ॥
सदोदीत एकांतवासी रहावें ।
तसे ग्राम्य लोकात वाटे न जावे ॥ १० ॥

रमावें सदा जाण अध्यात्मबुद्धी ।
झटावें सदा जाण तत्त्वार्थ बोधी ॥
असे ज्ञान हेंची पहा बोलियेले ॥
विपर्यस्त जें तेचि अज्ञान झालें ॥ ११ ॥

तुला सांगतो ज्ञेय आता कळाया ।
जया जांणल्याने सरे मोह माया ॥
अनादी परब्रह्म नी श्रेष्ठ तेही ।
कळेना कुणा तेंच आहे कि नाही ॥ १२ ॥

मुखे डोकि सर्वत्र त्या भासताती ।
तसे हात नी पायही भास होती ॥
तसे कान सर्वत्रही भास होई ।
असे विश्व व्यापूनिया राहिलेही ॥ १३ ॥

खरें इंद्रियातीत आहें पहा तें ।
परी भास त्यांचा असा भासवीते ॥
अनासक्त आणीक थारा जगासी ।
गुणी भोग भासे तया निर्गुणासी ॥ १४ ॥

पहा आत बाहेर भूती रहाते ।
चरासी स्थिरासी नटोनी बसे ते ॥
अती सूक्ष्म आहे म्हणूनी कळेना ।
जगा व्यापिते दूर भासे जनांना ॥ १५ ॥

असूनी अवीभक्त भूतात राही ।
म्हणूनी विभक्तापरी भास होई ॥
तसे सर्व सृष्टीस जन्मास घाली ।
संहारि त्यासी तसे त्यास पाळी ॥ १६ ॥

तसे तेज तेजात तेंची असूनी ।
तसे थोर मायेहुनी तेंच मानी ॥
असे ज्ञान तेंची असे ज्ञेय तेंची ।
तसे भूतमात्रांतरी तें वसेची ॥ १७ ॥

तुला क्षेत्र नी ज्ञान नी ज्ञेयही तें ।
असे सर्व सांगीतलें थोडके तें ॥
तसे तत्त्वता जो पुरे ओळखीतो ।
असा भक्त माझा मला मेळवीतो ॥ १८ ॥

पहा प्रकृती नी तसाची पुरूष ।
अनादीच दोन्ही असे जाण त्यास ॥
त्रिगूणा तसेची विकारा धरून ।
असे प्रकृतीतून या जन्म जाण ॥ १९ ॥

अहंकार बुद्धी मना इंद्रियाते ।
असे प्रकृतीलाच कर्तृत्व येते ॥
तसे दुःख सूखास भोगावयाते ।
पुरूषाकडे जाण भोक्तृत्व येते ॥ २० ॥

जिवात्माच हा प्रकृतीच्या प्रसंगे ।
तिच्या त्या गुणासीच पाहूनि रंगे ॥
गुणातील प्रेमा तया सोडवेना ।
म्हणूनी शुभाशूभ जन्मा चुकेना ॥ २१ ॥

जरी हाचि देही रहातो पुरूष ।
तरी तो विदेही नि साक्षी परेष ॥
तसा तोच भर्ता नि भोक्ताहि जाण ।
तसाची असे तो परब्रम्ह पूर्ण ॥ २२ ॥

अशा पूरुषासी गुणी प्रकृतीसी ।
यथार्थे पुरे ओळखी जो तयासी ॥
जरी सर्व कर्मेंहि ज्ञानी करीतो ।
पुनर्जन्म त्यासी कदापी नसे तो ॥ २३ ॥

कुणी योग साधूनि ध्यानस्थ होती ।
परब्रह्म रूपास देही पहाती ॥
कुणी ज्ञानमार्गात रंगून जाती ।
कुणी कर्मयोगे मला मेळवीती ॥ २४ ॥

परी ज्ञान हें ज्या पुरें आकळेना ।
   विचारूनि घेती गुरू-सज्जनांना ।।
तसे भक्तिभावे जरी वागताती ।
   तरी तेहि मृत्यूस लंघून जाती ।। २५ ।।

जशी स्थावराते तशी जंगमाते ।
   जगी ज्या पदार्थास उत्पत्ति होते ।।
तिथे क्षेत्र क्षेत्रज्ञ संयोग जाण ।
   अशा सर्व सृष्टीस घे ओळखून ।। २६ ।।

परब्रह्म हें सारखें सर्व भूती ।
   जरी सर्वभूतेंच नाशास जाती ।।
अवीनाश हें ब्रह्म जो जाणतो तो ।
   खरा जाणणारा असा तोच होतो ।। २७ ।।

प्रभू तो सदा व्यापुनी सर्व राही ।
   तसा भाव ठेवोनि जो सर्व पाही ।।
तरी आत्मघाता कधी ना करीतो ।
   म्हणूनी गती उत्तमा मेळवीतो ।। २८ ।।

सदा प्रकृती हीच कर्मात राही ।
   तसे सर्व कर्तृत्वही तीच पाही ।।
अकर्ताच आत्मा असे जो पहातो ।
   खरा जाणणारा असा तोच होतो ।। २९ ।।

जरी दीसताती निराळींच भूतें ।
तरी आत्मभावे बघी जो तयाते ॥
चिदात्म्यातुनी सर्व विस्तार होतो ।
असे जाणतो तो मला मेळवीतो ॥ ३० ॥

परब्रह्म तें हें अनादीच आहे ।
तसे तें अवीनाश निर्गूण राहे ॥
जरी तोच आत्मा शरीरी रहातो ।
तरीही करेना मळेना मुळी तो ॥ ३१ ॥

जसे विश्व व्यापून आकाश राही ।
परी सूक्ष्मतेने मळेना कदाही ॥
तसाची शरीरास आत्माहि व्यापी ।
परी तो मळेना मुळीही कदापी ॥ ३२ ॥

असे एक भानू परी पार्थराया ।
प्रकाशीतसे तोच त्रीभूवना या ॥
तसा राहि क्षेत्रज्ञही एकटा तो ।
परी सर्व क्षेत्रां प्रकाशी पहा तो ॥ ३३ ॥

असा क्षेत्र आणीक क्षेत्रज्ञ भेद ।
तशी प्रकृतीचींहि कार्यें विवीध ॥
पुरे ज्ञान दृष्टीतुनी जे पहाती ।
परंधाम माझेंच ते मेळवीती ॥ ३४ ॥

* * *

इथे क्षेत्र आणीक क्षेत्रज्ञ यांचें ।
प्रभू बोलिले ज्ञान हें पूर्ण साचे ॥
असे येथ अध्याय तेरा जहाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

## अध्याय चौदावा

# गुणत्रयविभागयोग

श्रीभगवान म्हणाले

खरे थोर जे ज्ञानज्ञानातुनी या ।
पुन्हा सांगतो तें तुला पार्थराया ॥
मुनी सर्व जाणूनिया मुक्त झाले ।
परी सिद्धिला जाण तेही मिळाले ॥ १ ॥

अशा ज्ञान योगे सख्या पार्थराया ।
जिही मेळवीले पहा मत्पदा या ॥
तयालागि फेरा पुन्हा ना कदापी ।
जगें हीं किती आलि गेलीं तथापी ॥ २ ॥

पहा माझि ही प्रकृती क्षेत्र जाण ।
तिथे बीज माझ्या चिदंशास मान ॥
जडालागि चैतन्य जोडी जहाली ।
तिथूनीच हीं सर्व भूतें उदेलीं ॥ ३ ॥

पहा सर्व योनी मधेची जगीया ।
असे जे कुणी जन्मती पार्थराया ॥
तयांची असे प्रकृती जाण माता ।
पिता मी असे जाण जो बीजदाता ॥ ४ ॥

अशा प्रकृतीतून झाले त्रिगूण ।
तमासी रजासी नि सत्वासि जाण ।।
जरी निर्विकारी जिवात्मा परी तो ।
त्रिगूणामुळे बद्ध देहात होतो ।। ५ ।।

त्रिगूणामधे सत्त्व निर्दोष आहे ।
तसा निर्मळत्वे प्रकाशून राहे ।।
परी जीव त्याने सुखासक्त होतो ।
तसा बद्ध ज्ञानाभिमाने रहातो ।। ६ ।।

रजाच्यामधे वासना जन्मताती ।
तशी वीषयातून तृष्णा रहाती ।।
म्हणूनीच आत्म्यास कर्मात गोवी ।
तिथे बद्ध व्हाया पुढे तोचि लावी ।। ७ ।।

तमोगूण अज्ञानची आणवीतो ।
तशी झोप नी आळसा वाढवीतो ।।
तसेचीहि आत्म्यास मोहात गोवी ।
तिथे बद्ध व्हाया पुढे तोचि लावी ।। ८ ।।

पहा सत्त्वगूणे सुखा वाढ होते ।
रजोगूण कर्मात घालू पहाते ।।
तमोगूण ज्ञानास वाटेस लावी ।
प्रमादात इच्छा तयाने गणावी ।। ९ ।।

रजाते तमाते अशा या गुणाते ।
पहा सत्त्व जिंकी यशा मेळवीते ॥
रजोगूण सत्त्वातमातेहि जिंकी ।
तमोगूण सत्त्वारजातेहि झाकी ॥ १० ॥

तसेचीहि देहामधे इंद्रियाते ।
प्रकाशास ज्ञानास उत्पत्ति होते ॥
तशी अंतरीही तया वाढ होई ।
पहा तेथ सत्त्वास स्वामित्व राही ॥ ११ ॥

अज्ञांनी तशी वृत्ति लोभात होते ।
तशीची प्रवृत्तीहि कर्मी रहाते ॥
तशी वीषयामाजि आसक्ति राही ।
रजोगूण स्वामित्व तेथेच पाही ॥ १२ ॥

तसे इंद्रियातून अज्ञान वाढे ।
प्रवृत्ती नको त्याहि कर्मात जोडे ॥
प्रमादातही वाढ मोहात राही ।
असे हे तमोगूण स्वामित्व पाही ॥ १३ ॥

जयावेळि सत्त्वात स्वामित्व राहे ।
तया वेळि देहास जो ठेविताहे ॥
तरी स्वर्गलोकास तो प्राप्त होतो ।
तिथे थोर लोकासवे तो रहातो ॥ १४ ॥

रजोत्कर्ष कालात जो लीन झाला ।
तरी कर्मि आसक्त जन्मास आला ॥
तमोगूण कालात जो देह ठेवी ।
पशू मूढ योनी तयासी गणावी ॥ १५ ॥

तसा सत्त्वगूणात जो मग्न राही ।
तयासी फळें तीहि निर्भेळ पाही ॥
रजोगूण दुःखी फळें देत जातो ।
तमोगूण अज्ञानकारी रहातो ॥ १६ ॥

तसे सत्त्वगूणातुनी ज्ञान पावें ।
रजोगूण लोभासही तो दुणावे ॥
तमोगूण पाही प्रमादास वाही ।
तसे मोह आणीक अज्ञान तीही ॥ १७ ॥

तसे सत्त्वगूणात स्वर्गास जावें ।
रजाच्या गुणे मृत्युलोकी रहावें ॥
तमाच्या गुणे हीन वृत्ती धरीती ।
अधःपात होऊन खाली वहाती ॥ १८ ॥

गुणांचा असा खेळ ज्ञानीच पाहे ।
तयासी पुरेपूर तो जाणताहे ॥
गुणातीत ऐसे मला ओळखीतो ।
स्वरूपात माझ्या मिळूनीहि जातो ॥ १९ ॥

निमित्तास देहास हे गूण तीन्ही ।
गुणातीत जे तेच जाती तरूनी ॥
जरा मृत्यु जन्मास लंघून जाती ।
सदानंद ऐशा पदा मेळवीती ॥ २० ॥

अर्जुन म्हणाला

कसा तीन गूणास लंघून गेला ।
कशा लक्षणांनी पहावें तयाला ॥
कसा काय आचार त्याचा पहावा ।
गुणातीत झाला कसा सांग देवा ॥ २१ ॥

श्रीभगवान म्हणाले

प्रवृत्ती तसे मोह आणी प्रकाश ।
अशीं तीन कार्यें तयांचा विकास ॥
मिळाल्यास तो खेद काही करीना ।
तसा लोप झाल्यास आशा धरीना ॥ २२ ॥

उदासीनसा जो जगी या रहातो ।
चळेना कधीही गुणांच्यामुळे तो ॥
गुणांचाचि हा खेळ हें जाणुनीया ।
सुखे स्थीर राही पहा पार्थराया ॥ २३ ॥

तसे सूख नी दुःख त्यासी समान ।
तसेचीहि सोनें नि मातीहि जाण ॥
तसे प्रीय अप्रीय हें सारखेची ।
स्तुती आणि निंदाहि त्यासी तशीची ॥ २४ ॥

तसे मित्र शत्रूहि त्यासी समान ।
तसाची असे त्यास मानापमान ।।
अभीमान कर्मात सोडून देतो ।
असा जाण तोची गुणातीत होतो ।। २५ ।।

सदा तो मलाही अनन्येचि राही ।
करूनीहि भक्ती भजे सर्वदाही ।।
गुणा सर्व ओलांडुनी तोचि जातो ।
तसा मत्पदासीहि तो मेळवीतो ।। २६ ।।

परब्रह्म मीही अवीनाश मीही ।
सुखाचें परंधाम तें मीच पाही ।।
तसा नित्य जो धर्म तो मीच आहे ।
तया आसरा जाण माझाच राहे ।। २७ ।।

* * *

त्रिगूणे पुनर्जन्म फेरा जिवाला ।
परी टाळितो भक्त माझा तयाला ।।
असे येथ अध्याय चौदा जहाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ।।

## अध्याय पंधरावा

# पुरुषोत्तमयोग

श्रीभगवान म्हणाले

जयाचे वरी मूळ शाखा तळाला ।
असा हा अवीनाश अश्वत्थ झाला ॥
तशी त्यास पानें श्रुती छंद होती ।
तया वेदवेत्ते पुरे जाणताती ॥ १ ॥

त्रिगूणात शाखा तशा वीषयात ।
वरी आणि खालीहि झाल्या अनंत ॥
मुळे वासनांचीहि कर्मानुसारे ।
जिवा भोवती जाण नाना प्रकारे ॥ २ ॥

तसे रूप याचें कसें तें कळेना ।
तसा अंत आदी स्थिती आकळेना ॥
अशा भारि वृक्षा असंगे करूनी ।
प्रभावी असा छेद घे निश्चयानी ॥ ३ ॥

पुढे सत्पदाचा पुरा शोध घेई ।
जिथूनी कुणीही फिरेना कदाही ॥
तया ब्रह्मरूपा अनन्ये असावें ।
जिथूनी प्रवृत्तीहि विस्तार पावे ॥ ४ ॥

पहा मान नी मोह नाहीं जयाला ।
अनासक्त अध्यात्मि जो स्थीर झाला ॥
सुख दु:ख द्वंद्वे गळालीं जयाचीं ।
अवीनाश सिद्धी मिळे त्यास साची ॥ ५ ॥

रवी ज्या पदासी प्रकाशू शकेना ।
तिथे चंद्र अग्नीसही शक्य ते ना ॥
जिथे योगि गेल्या फिरेना कदाही ।
परंधाम माझें सख्या तेंच पाही ॥ ६ ॥

शरीरी जिवात्मा असे जो जगात ।
सख्या अंश माझाच तो मूर्तिमंत ॥
मना या तशा पाच ज्ञानेंद्रिया या ।
पहा ओढितो प्रकृतीपासुनीया ॥ ७ ॥

जया वेळि हा ईश देहात येतो ।
तसा तो जयावेळि बाहेर जातो ॥
तदा इंद्रियासी मनासीहि नेई ।
जसा वायु गंधास घेऊन जाई ॥ ८ ॥

त्वचा नेत्र नाका नि काना जिभेला ।
अशा पाच ज्ञानेंद्रियांना मनाला ॥
सदा आसरा घेउनीया रहातो ।
तिथे विषयासी सदा भोग घेतो ॥ ९ ॥

शरीरात राही कि बाहेर जाई ।
तसा तो गुणी राहि की भोग घेई ॥
असा जीव हा कोण अशा कळेना ।
परी त्या यथार्थे पहातो शहाणा ॥ १० ॥

जिवात्म्यास देहात योगी पहाती ।
सदभ्यास योगेच ते ओळखीती ॥
परी ज्ञानहीना अशा या जनांना ।
प्रयत्ना करूनीहि काही कळेना ॥ ११ ॥

पहा जें रवीतेज तें पार्थराया ।
प्रकाशीतसे जेंचि त्रीभूवना या ॥
तसे तेज चंद्रात अग्नीतही जें ।
असे सर्वही तेज तें जाण माझें ॥ १२ ॥

शिरूनीहि पृथ्वीमधे मी रहातो ।
तिथे धारणा सर्व भूतात घेतो ॥
तसा सोमही मीच होतो जगी या ।
तिथे औषधी सर्वही पोषवाया ॥ १३ ॥

तसे रूप वैश्वानराचें[1] धरीतो ।
जिवांच्या शरीरी शिरूनी रहातो ॥
अपानात प्राणात माझी नियुक्ती ।
चतुर्वीध अन्नें पचूनीहि जाती ॥ १४ ॥

---

१ जठराग्नीचें

तसा अंतरी मी जिवांच्या रहातो ।
स्मृती ज्ञान तर्कासही मीच देतो ॥
जसा सर्व वेदांस मी वेद आहे ।
तसा वेदकर्ता नि वेदज्ञ राहे ॥ १५ ॥

पहा दोन येथे रहाती पुरूष ।
तया नाम दोघा क्षरा अक्षरास ॥
पहा सर्व भूतांक्षरासी म्हणावें ।
तसे अक्षरा स्थीर तत्त्वा गणावें ॥१६ ॥

पुरूषोत्तमालागि भिन्नत्व पाही ।
परब्रह्महो तोच जाणून घेई ॥
अवीनाश जो ईश सर्वांत आहे ।
त्रिलोकास पोषूनिया राहताहे ॥ १७ ॥

क्षराहूनिही मी असे श्रेष्ठ जाण ।
तसा अक्षराहूनिही थोर मान ॥
म्हणूनी तया वेद नी लोक गाती ।
तसेची तया वंदुनी पूजिताती ॥ १८ ॥

तसा जाण ज्ञानीहि तो पार्थराया ।
पुरूषोत्तमासी पुरे जाणुनीया ॥
तसा भाव ठेवूनि सर्वां पहातो ।
तसा भक्तिभावे भजूनी रहातो ॥ १९ ॥

असे गूढ अत्यंत बा पार्थराया ।
तुला शास्त्र सांगीतलें तें कळाया ॥
तया जाणल्याने पुरे ज्ञान होई ।
पुढे तो पहा धन्य होऊनि जाई ॥ २० ॥

* * *

जिवात्मा असे मीच या सर्व देही ।
जगा म्या पुरूषोत्तमे व्यापिलेही ॥
असे पंधरा येथ अध्याय झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥



अध्याय सोळावा

# दैवासुरसंपद्विभागयोग

श्रीभगवान म्हणाले

मनाचा अतीशुद्ध भीती न काही ।
सदा इंद्रियासी पुरा संयमीही ॥
खरा ज्ञानि नी निश्चयीही रहातो ।
तसा तोच सात्वीक दानेंहि देतो ॥ १ ॥

अहिंसा तसे सत्य अक्रोध शांती ।
दया भूतमात्री नि त्यागी विरक्ति ॥
मुळी लोभ नाही अनासक्त राही ।
अनाचारि लज्जा असे सर्वदाही ॥ २ ॥

सदाचार शुद्धी नि तेजस्विता ती ।
क्षमा धैर्य आणीक अद्रोहि होती ॥
सुदैवात ज्याचा जगी जन्म झाला ।
तरी गूण हे प्राप्त होती तयाला ॥ ३ ॥

अभीमान नी दंभ अज्ञान पाही ।
अती क्रोध आणीक गर्वात राही ॥
अशा आसुरी संपदेच्या जनासी ।
असे लाभती गूण पार्था तयासी ॥ ४ ॥

अशी दैवि संपत्ति मोक्षास नेते ।
परी आसुरी बंध घाली तयाते ॥
तुला अर्जुना जाण भीतीच नाही ।
खऱ्या दैवि संपत्तिचा तू सदाही ॥ ५ ॥

जगी भूतसृष्टीत या दोन जाती ।
असे आसुरी अेक दैवी दुजी ती ॥
वरी दैवि विस्तार सांगून झाला ।
पुढे ऐक मी सांगतो आसुरीला ॥ ६ ॥

अकार्यं नि कार्यें कशी तीं कळेना ।
पहा अर्जुना आसुरीच्या जनांना ॥
सदाचार नी सत्य ठाऊक नाही ।
तसेचीहि पावित्र्य त्यांना न काही ॥ ७ ॥

तया देव खोटा नि हें विश्व खोटें ।
तसेची निराधार हें विश्व वाटें ॥
जगी फक्त भोगास ते मानताती ।
दुजे काय आहे असे बोलताती ॥ ८ ॥

अशी ही पहा सृष्टि खोटी धरूनी ।
महामूर्ख ते नष्ट नी दुष्ट मानी ॥
अती क्रूर होऊनि कर्मे करीती ।
जगाच्याच नाशार्थ ते जन्मताती ॥ ९ ॥

तसे लोक हे भारि कामांध पाही ।
मदांधी नि मानी नि दांभीक तेही ॥
तसेचीहि मोहात गुंगून जाती ।
पुढे ते दुराचार प्रवृत्त होती ॥ १० ॥

असे भारि चिंता पहा या जनांना ।
मरेतोंवरीही कशीही सुटेना ॥
तसे सर्व भोगांत तल्लीन होती ।
पुढे तेचि सर्वस्व हे मानताती ॥ ११ ॥

तसे बद्ध होतात आशेत जाण ।
तसे काम नी क्रोध यात प्रवीण ॥
करीतात भोगार्थ भारी अनीती ।
तदर्थी धना साठवू पाहताती ॥ १२ ॥

असा आज हा लाभ मोठा मिळाला ।
तसाची दुजा तोहि पाहू उद्याला ॥
अशा या धनाचा धनी मीच आहे ।
पुढे जें मिळें तेंहि माझेंच पाहे ॥ १३ ॥

असा आज हा वैरि मी ठार केला ।
तसाची दुजाही पहातो उद्याला ॥
प्रभू मीचि आणिक भोक्ता तसाची ।
बळी मीचि स्वामी सुखीही असेची ॥ १४ ॥

कुलीनात मोठा नि संपन्न मीही ।
जगी या मला जोड कोणीच नाही ॥
करी मीच हे यज्ञ मोठाच दानी ।
असे मूढ मोहात जाती बुडूनी ॥ १५ ॥

असे चित्त ज्यांचें भ्रमाने बुडालें ।
तसे मोहजाळात गुंतून गेले ॥
पुढे वीषयामाजि आसक्त होती ।
अती घोर नर्कात ते बूडताती ॥ १६ ॥

अहंमन्य आणीक गर्विष्ठ पाही ।
धनाने नि माने अती माजतीही ॥
तसे यज्ञ नावास ते आचरीती ।
सदोदीत दंभातही वागताती ॥ १७ ॥

अहंकार गर्वी बळीही असूनी ।
तसे क्रोध कामीहि जाती भरूनी ॥
शरीरात यांच्या दुजांच्याहि राही ।
मदांधे मला जाणती ना कधीही ॥ १८ ॥

अशा दुष्ट आणीक पापी जनासी ।
तसेचीहि उन्मत्त क्रूराधमासी ॥
अशांनाच मी योग्य जागीच नेतो ।
सदा आसुरी योनि त्या फीरवीतो ॥ १९ ॥

अशा जन्मजन्मान्तरी मूढ ज्ञाती ।
सदा आसुरी योनि ते पावताती ॥
मला पोचणें त्या मिळेना कदाही ।
सदा घोर नर्कामध्ये बूडतीही ॥ २० ॥

पहा काम नी क्रोध नी लोभ भारी ।
असे तीन हे आत्मघाती नि वैरी ॥
अशीं घोर नर्कासिही तीन दारें ।
तरी यास टाळी सख्या पांडवा रे ॥ २१ ॥

तमाचीं पहा तीन दारें अशीं हीं ।
शहाणा सदा मुक्त यातून राही ॥
तयानेच कल्याण साधून घेतो ।
पुढे तो परावी गती मेळवीतो ॥ २२ ॥

परी शास्त्र मार्गासि जे सोडताती ।
सदा स्वैर आचार जे ठेविताती ॥
तया सूख नाही नि सिद्धीहि नाही ।
तयासी परावी गती दूर राही ॥ २३ ॥

म्हणूनीच शास्त्रास प्रामाण्य मानी ।
अकार्यास कार्यास घे ओळखूनी ॥
तसा शास्त्र सर्वार्थ जाणून घ्यावा ।
सदाचार तूही तसाची करावा ॥ २४ ॥

* * *

करी संपदा आसुरी बद्ध येथे ।
परी मुक्त दैवी करी या जनाते ॥
असे येथ अध्याय सोळा जहाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

## अध्याय सतरावा

# श्रद्धात्रयविभागयोग

अर्जुन म्हणाला

विधी शास्त्र सोडून जे वागताती ।
परी पूजनी तेच श्रद्धा धरीती ॥
तयांची स्थिती काय कैशी धरावी ।
त्रिगूणामधुनी मला दाखवावी ॥ १ ॥

श्रीभगवान म्हणाले

जनांच्या स्वभावात श्रद्धा रहाते ।
प्रकारांत तीन्ही गुणा दाखवीते ॥
तमाची रजाची तशी सात्त्विकाची ।
कशी सांगतो ऐक ते सव्यसाची ॥ २ ॥

जनी प्रकृतीच्या स्वभावानुरूप ।
रहाते तशीचीहि श्रद्धा अमाप ॥
जशी जाण श्रद्धा तसे ते पहाती ।
तसे तेहि श्रद्धेप्रमाणे रहाती ॥ ३ ॥

पहा देवपूजा करी सत्त्वगूणी ।
रजोगूणि यक्षा राक्षसा पूज्य मानी ॥
पहा तामसी भूतखेता पुजीतो ।
तसा प्रेतपूजेसही मान देतो ॥ ४ ॥

तसे शास्त्र जे लोक सोडून देती ।
अती घोर ऐशा तपा आचरीती ॥
तसा दंभ आसक्ति तीही सकामी ।
अहंताबळाने करीतात मी मी ॥ ५ ॥

तसे इंद्रियासी अती त्रास देती ।
मला आत्मवासी बहू पीडिताती ॥
विवेकात शून्यत्व राही जनी या ।
तयांची स्थिती आसुरी पार्थराया ॥ ६ ॥

पहा सर्व लोकी रुची भिन्न भिन्न ।
तयांच्या प्रकारांतही तीन गूण ॥
तसे यज्ञदानी तपासी धरूनी ।
पहा तेंहि आहेत तीन्ही त्रिगुणी ॥ ७ ॥

सुखस्वास्थ्य प्रीती बळा वाढवीती ।
तसेंचीहि आयुष्य आरोग्य देती ॥
तसे गोड पौष्टीक आनंददाई ।
असे सर्व आहार सात्त्वीक घेई ॥ ८ ॥

अती ऊष्ण खारे तसे तीव्र बा रे ।
कडू आम्लही फार नी रुक्ष सारे ॥
तसे रोगकारी नि दुःखेंहि भारी ।
रजा[1] प्रीय तें अन्न नाना विकारी ॥ ९ ॥

---

१ राजसांना

शिळें आणि उष्टें तसे वाळलेलें ।
रुचीहीन घाणेरडें आंवलेलें ॥
तसें अन्न यज्ञात जें वर्जिताती ।
अशाचीच घे तामसी फार प्रीती ॥ १० ॥

फलाचा अभीलाष सोडून देतो ।
मनाचें समाधान ठेवून घेतो ॥
विधीनेच शास्त्रोक्त जे यज्ञ केले ।
तरी जाण ते यज्ञ सात्त्वीक झाले ॥ ११ ॥

फलाची परी जाण आशा धरूनी ।
तसेंचीहि दांभीक तेंही असूनी ॥
असे यज्ञ लोकात जे आचरीती ।
रजातून ते सर्व निर्माण होती ॥ १२ ॥

नसे मंत्र काही विधी तोहि नाही ।
नसे अन्न काही नसे दक्षिणाही ॥
नसे ज्यात श्रद्धा असा यज्ञ केला ।
तरीं तो तमापासुनी जाण झाला ॥ १३ ॥

गुरू देव विद्वान या पूजुनीया ।
अहिंसा शुचिर्भूतता राखुनीया ॥
सदा आर्जवी ब्रह्मचर्यें रहावें ।
तपालागि कायीक त्यासी म्हणावें ॥ १४ ॥

तसे बोलणें तें नसे तापदाई ।
असे सत्य नी गोड कल्याण होई ॥
तसे वेदशास्त्रा सदाची पढावें ।
तपालागि वाचीक यासी म्हणावें ॥ १५ ॥

मनाचें प्रसन्नत्व आणीक शांती ।
मनोनिग्रही आणि मौनी रहाती ॥
सदा शुद्ध भावेच राहे स्वभावे ।
तपा मानसाच्या[1] असें त्या म्हणावें ॥ १६ ॥

फलाची अपेक्षा पुरी सोडुनीया ।
तशी थोर श्रद्धा पुरी ठेवुनीया ॥
अशा याच तीन्ही तपा आचरीलें ।
तपा लागि सात्त्वीक तें बोलियेलें ॥ १७ ॥

तसा मान सत्कार व्हावा म्हणूनी ।
तशी वृत्ति दांभीकही चालवूनी ॥
क्षणैका फलाचे असे आचरीले ।
अशा या तपा राजसी बोलियेलें ॥ १८ ॥

अती दुष्ट दूराग्रहासी धरूनी ।
स्वयेची शरीरास या कष्टवूनी ॥
परानाश व्हावा म्हणूनीच केलें ।
तपाला अशा तामसी बोलियेलें ॥ १९ ॥

---

१ मानसिक तप

मनातूनि कर्तव्य बुद्धी धरूनी ।
तसे नाहि प्रत्यूपकारी म्हणूनी ॥
तसे देश नी काल पात्रीच केलें ।
असें दान सात्त्वीकची बोलियेलें ॥ २० ॥

सदोदीत प्रत्यूपकारीच ऐशा ।
फलाची तशीचीहि इच्छा अपेक्षा ॥
तसे क्लेश भारी करूनी दिलेले ।
असे दान तें राजसी बोलियेलें ॥ २१ ॥

अपात्रास पात्रास ना पाहताती ।
सत्कार आतिथ्यही वर्जिताती ॥
अवज्ञा करूनीहि जें दान केलें ।
असे दान तें तामसी बोलियेलें ॥ २२ ॥

पहा ॐ–तत्–सत् तिहेरी असा तो ।
खरा नाम निर्देश ब्रह्मास होतो ॥
अनादीच यातून हे वेद आले ।
तसे यज्ञ तैसे मुनी जन्मलेले ॥ २३ ॥

म्हणूनीच आरंभ काली मुनीही ।
करीतात ॐकार उच्चार पाही ॥
तपासी तसे दान यज्ञासही या ।
करीतात आरंभ बा पार्थराया ॥ २४ ॥

करी तत् पदाचाहि उच्चार आणी ।
फलाशेसही सर्व कर्मी त्यजूनी ॥
पुढे यज्ञदानें तपादी क्रिया या ।
करीतात मोक्षार्थ ते पार्थराया ॥ २५ ॥
तसा सत् पदाचाहि उच्चार केला ।
तरी सत्यभावास तो योजियेला ॥
तसेचीहि सत्कर्मची आचराया ।
करीतात निर्देश ते पार्थराया ॥ २६ ॥
अशा यज्ञ दाना तपा आचरीती ।
तरी त्याहि श्रद्धेस सत् बोलताती ॥
तसें कर्म देवासि जें योजियेलें ।
तयासीहि सत्कर्मची बोलियेलें ॥ २७ ॥
करीती जरी यज्ञ दानें तपेंही ।
परी त्यात श्रद्धा कशी तीहि नाही ॥
अशीं सर्व कर्में फुकाचींच जातीं ।
परा लोकि या लोकि तीं व्यर्थ्य होतीं ॥ २८ ॥

* * *

त्रिगूणात श्रद्धा कशी होत जाते ।
कशी यज्ञ दानी तपातून होते ॥
असे येथ अध्याय सत्रा जहाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

## अध्याय अठरावा

# मोक्षसंन्यासयोग

अर्जुन म्हणाला

कसें काय संन्यास हें तत्त्व देवा ।
कसा काय तो त्यागही ओळखावा ।।
असें वेगळें वेगळें तें कळाया ।
मला सांगता का प्रभो देवराया ।। १ ।।

श्रीभगवान म्हणाले

पहा काम्य कर्में मुळी सोडताती ।
तया जाण संन्यासची बोलताती ।।
तसे सर्व कर्मी फळें सोडतात ।
तयाला पहा त्यागची मानतात ।। २ ।।

परी सर्व कर्में सदोषी म्हणूनी ।
त्यजावीं असें बोलतातीहि कोणी ।।
कुणी यज्ञ दानें तपा मानताती ।
कधी ना त्यजावीं असें इच्छिताती ।। ३ ।।

परी त्याग हा ऐक माझ्या मताने ।
तुला सांगतो मी पहा निश्चयाने ।।
प्रकारात याच्याहि बा पार्थराया ।
तऱ्हा तीन होती जना आचराया ।। ४ ।।

पहा यज्ञ दाना तपा ना त्यजावें ।
सदिच्छे तयांना सदा आचरावें ॥
अशी सर्व कर्में पहा जाणत्यासी ।
मना शुद्धकारी सख्या पुण्यराशी ॥ ५ ॥

परी त्यात आसक्ति काही नसावी ।
तसेची फलाशाहि सोडून द्यावी ॥
अशा या मताशीच निश्चीत केलें ।
तसे श्रेष्ठही तेच मी ओळखीलें ॥ ६ ॥

तसे कर्म कर्तव्य जें नित्य आहे ।
तयाचा पहा त्याग तो योग्य नोहे ॥
जरी काहि मोहामुळे त्याग केला ।
तरी त्याग तो तामसी बोलियेला ॥ ७ ॥

अती कष्ट कर्मी असे पाहुनीया ।
करी त्याग जो कष्टची टाळण्या या ॥
तरी तीं फळें लाभती ना तयाला ।
असा त्याग तो राजसी बोलियेला ॥ ८ ॥

परी नेमलेलें करी कर्म जाण ।
तसे तेंच कर्तव्य हें ओळखून ॥
फळे आणि आसक्तिही सोडलेला ।
असा त्याग सात्त्वीकची बोलियेला ॥ ९ ॥

जरी क्लेश कर्मी तरी द्वेष नाही ।
मना इष्ट कर्मात ना गुंतवीही ॥
असा शुद्ध सात्त्वीक निःसंशयी तो ।
खरा तोचि ज्ञानी नि त्यागीहि होतो ॥ १० ॥

जगी सर्व कर्मास सोडून देणें ।
असे देहवंता नसे शक्य जाणें ॥
म्हणूनी फलत्याग जे योजितात ।
खरे तेच त्यागी असे बोलतात ॥ ११ ॥

तिहेरी फळें जाण कर्मी रहातीं ।
बरी आणि वाईट नी मिश्रही तीं ॥
फलासक्त मेला तरी भोवतात ।
परी त्यागवंता न तीं बाधतात ॥ १२ ॥

अशी सर्व कर्में पहा साधण्याला ।
खरीं कारणें पाच आहेत याला ॥
तशीं सांख्यशास्त्रामधे[1] बोललीं हीं ।
तयांसीहि सांगेन ऐकून घेई ॥ १३ ॥

पहा देह हें एक कर्ता दुजे ते ।
तशी इंद्रियें हीं तिजे जाण होते ॥
तयांच्या क्रिया यास चौथे म्हणावें ।
तसे पाचवे दैव ऐसे गणावें ॥ १४ ॥

---

१ वेदान्तशास्त्रामध्ये

पहा यज्ञ दाना तपा ना त्यजावें ।
सदिच्छे तयांना सदा आचरावें ॥
अशी सर्व कर्मे पहा जाणत्यासी ।
मना शुद्धकारी सख्या पुण्यराशी ॥ ५ ॥

परी त्यात आसक्ति काही नसावी ।
तसेची फलाशाहि सोडून द्यावी ॥
अशा या मताशीच निश्चीत केलें ।
तसे श्रेष्ठही तेच मी ओळखीलें ॥ ६ ॥

तसे कर्म कर्तव्य जें नित्य आहे ।
तयाचा पहा त्याग तो योग्य नोहे ॥
जरी काहि मोहामुळे त्याग केला ।
तरी त्याग तो तामसी बोलियेला ॥ ७ ॥

अती कष्ट कर्मी असे पाहुनीया ।
करी त्याग जो कष्टची टाळण्या या ॥
तरी तीं फळें लाभती ना तयाला ।
असा त्याग तो राजसी बोलियेला ॥ ८ ॥

परी नेमलेलें करी कर्म जाण ।
तसे तेंच कर्तव्य हें ओळखून ॥
फळे आणि आसक्तिही सोडलेला ।
असा त्याग सात्त्वीकची बोलियेला ॥ ९ ॥

जरी क्लेश कर्मी तरी द्वेष नाही ।
मना इष्ट कर्मात ना गुंतवीही ॥
असा शुद्ध सात्त्वीक निःसंशयी तो ।
खरा तोचि ज्ञानी नि त्यागीहि होतो ॥ १० ॥

जगी सर्व कर्मांस सोडून देणें ।
असे देहवंता नसे शक्य जाणें ॥
म्हणूनी फलत्याग जे योजितात ।
खरे तेच त्यागी असे बोलतात ॥ ११ ॥

तिहेरी फळें जाण कर्मी रहातीं ।
बरी आणि वाईट नी मिश्रही तीं ॥
फलासक्त मेला तरी भोवतात ।
परी त्यागवंता न तीं बाधतात ॥ १२ ॥

अशी सर्व कर्में पहा साधण्याला ।
खरीं कारणें पाच आहेत याला ॥
तशीं सांख्यशास्त्रामधे[1] बोललीं हीं ।
तयांसीहि सांगेन ऐकून घेई ॥ १३ ॥

पहा देह हे एक कर्ता दुजे ते ।
तशी इंद्रियें हीं तिजे जाण होते ॥
तयांच्या क्रिया यास चौथे म्हणावें ।
तसे पाचवे दैव ऐसे गणावें ॥ १४ ॥

---

१ वेदान्तशास्त्रामध्ये

जगी जाण काया नि वाचा मनाने ।
कुणीही करी कर्म ज्या भावनेने ॥
अधर्मी कि धर्मी असो दे कशीही ।
परी कारणें हीं खरीं पांच पाही ॥ १५ ॥

अशी ही स्थिती जो जरी पाहताहे ।
तरी मीच कर्ता असें मानताहे ॥
तया बुद्धि संस्कार काहीच नाही ।
अशा मानवा हें कळेना कदाही ॥ १६ ॥

जयासी अहंभाव काही असेना ।
तशी बुद्धिही लिप्त कोठे वसेना ॥
पहा विश्व सारेंहि मारी जरी तो ।
तरी तो न मारीहि ना बद्ध होतो ॥ १७ ॥

पहा ज्ञेय ज्ञाता तसें ज्ञान जाण ।
क्रियेसी अशीं बीजरूपेंच मान ॥
तशीं इंद्रियें कर्म कर्ता अशीं तीं ।
खरी तीन कर्मांग रूपेंच होतीं ॥ १८ ॥

पहा ज्ञान कर्ता तसें कर्म तेंही ।
त्रिगूणातले भेद त्यांचेहि पाही ॥
तसा सांख्यशास्त्रात सिद्धान्त केला ।
यथाशास्त्र तो तूहि ऐके तयाला ॥ १९ ॥

जरी सर्व भूतें निराळीं रहातीं ।
तरी एक भावात ती दीसताती ॥
अभिन्नत्व ज्याने दिसूनीहि आलें ।
असें ज्ञान सात्त्वीकची बोलियेलें ॥ २० ॥

पहा सर्व भूतांत भिन्नत्त्व दावी ।
तसा भेद बुद्धीस देऊन ठेवी ॥
असे भाव जें दाखवीतें निराळें ।
तरी ज्ञान तें राजसी बोलियेलें ॥ २१ ।

उगाचाचि एकाच कार्यात गुंते ।
मती भारि आसक्त होऊन जाते ॥
नसें तत्त्व काही असें हीन झालें ।
तरी ज्ञान तें तामसी बोलियेलें ॥ २२ ।

करी कर्म जें त्यात आसक्ति नाही ।
तशी प्रीति नी द्वेष तेंही न काही ॥
फळाची अपेक्षाहि जें टाकलेलें ।
असें कर्म सात्त्वीकची बोलियेलें ॥ २३ ॥

फळाची अपेक्षा धरूनी करीती ।
अहंकार ज्यासी असे पूर्ण चित्ती ॥
खटाटोप भारी करूनी जहाले ।
असे कर्म तें राजसी बोलियेलें ॥ २४ ॥

तशी हानि हिंसा नि शक्ती न काही ।
परीणाम तोही विचारात नाही ॥
तसे मोहपाशांत आरंभिलेले ।
असे कर्म तें तामसी बोलियेलें ॥ २५ ॥
अहंकार नाही नि आसक्ति नाही ।
तसे धैर्य उत्साह राखी सदाही ॥
असिद्धी नि सिद्धी समानी जयाला ।
तरी तोच सात्वीक कर्ता जहाला ॥ २६ ॥
फलेच्छू नि कामूक लोभी सदाही ।
अशूची[1] नि आसक्त नी घातकीही ॥
तसा हर्ष नी शोक भारी जयाला ।
तरी राजसी तोच कर्ता जहाला ॥ २७ ॥
असे अज्ञ गर्विष्ठ स्वच्छंदि भारी ।
विषादी कृतघ्नी तसा दीर्घ सूत्री ॥
तसा आळशी आणि दुर्मूखलेला ।
तरी तामसी तोच कर्ता जहाला ॥ २८ ॥
तसे भेद बुद्धीमधे तीन होती ।
तसे ते धृतीच्या[2] मधेही रहाती ॥
त्रिगूणानुसारेच हें सर्व झालें ।
पहा अर्जुना सांगतो वेगळालें ॥ २९ ॥

---

१ अपवित्र. २ धारणाशक्तीच्या.

अकार्या नि कार्या प्रवृत्ती निवृत्ती ।
तसा बंध नी मोक्ष भीती अभीती ॥
यथार्थे जिने ही पुरी ओळखीली ।
अशी बुद्धि सात्त्वीकची बोलियेली ॥ ३० ॥

अधर्मात धर्मात काही कळेना ।
अकार्या तसे कार्य तें आकळेना ॥
यथार्थत्वतेने कळेनाशि झाली ।
अशी बुद्धी ती राजसी बोलियेली ॥ ३१ ॥

अधर्मासही धर्म मानून घेई ।
तमोगूण योगेच अंधत्व येई ॥
पहा सर्व गोष्टी विपर्यस्त घाली ।
अशी बुद्धी ती तामसी बोलियेली ॥ ३२ ॥

मनासी नि प्राणासि नी इंद्रियांसी ।
धरूनी क्रिया चालवीते पुरेशी ॥
अनन्ये सदा ध्यानधारी जहाली ।
धृती जाण सात्त्वीक ती बोलियेली ॥ ३३ ॥

परी जाण धर्मार्थ कामार्थ पाही ।
मनाने बहूतेक आसक्त होई ॥
फलाशेत भारी असे बूडलेली ।
धृती जाण ती राजसी बोलियेली ॥ ३४ ॥

भयासी नि शोकासि जी वाढवीते ।
तशी जाण निद्रा मदा आणवीते ॥
तशी खिन्नत्ता आणि दुर्बुद्धि झाली ।
धृती तामसी जाण ती बोलियेली ॥ ३५ ॥

सुखाच्या प्रकारातही तीन जाती ।
कशा जाण होती पहा तीच रीती ॥
रमे जाण अभ्यासयोगे जिथे तो ।
जयाने तसाचीहि दुःखान्त होतो ॥ ३६ ॥

विषासारखे जाण आरंभकाली ।
परी शेवटी त्यात गोडी उदेली ॥
तसे आत्मबुद्धीप्रसादे मिळालें ।
असें सूख सात्त्वीकची बोलियेलें ॥ ३७ ॥

तसा वीषयेंद्रीय संयोग होतो ।
बहू गोड आधीच वाटे पहा तो ॥
परी शेवटी जें विषारी जहालें ।
असें सूख तें राजसी बोलियेलें ॥ ३८ ॥

सदा जाण आरंभि आणीक अंती ।
अती मोह चित्तास निर्माण होती ॥
प्रमादात नी आळसातून आलें ।
असें सूख तें तामसी बोलियेलें ॥ ३९ ॥

पहा स्वर्गलोकी नि पृथ्वीवरी या ।
तसे देवलोकातही पार्थराया ॥
पहा प्रकृतीतील गूणत्रयांनी ।
निराळा असा जाण नाहीच कोणी ॥ ४० ॥
पहा ब्राह्मणांचीं तशी क्षत्रियांचीं ।
तसे वैश्य नी शूद्र यांचीं तशीची ॥
अशीं सर्व कर्में गुणांतून आलीं ।
स्वभावाप्रमाणे विभागून गेलीं ॥ ४१ ॥
शमासी दमासी तपासी धरून ।
क्षमा शौच[1] विज्ञान नी ज्ञान जाण ॥
तशी बुद्धि आस्तिक्य हे ब्राह्मणाचे ।
स्वभावात येतात हे गूण साचे ॥ ४२ ॥
पहा शौर्य नी धैर्य नी दक्षताही ।
तसे जाण युद्धात भीरुत्व नाही ॥
तसे तेज दातृत्व हे क्षत्रियाचे ।
स्वभावात येतात हे गूण साचे ॥ ४३ ॥
पशूपालनी प्रीत व्यापार शेती ।
असे गूण वैश्य स्वभावात येती ॥
अशा तीन वर्णांत सेवा करूनी ।
रहावें स्वभावे असे शूद्र मानी ॥ ४४ ॥

---

१ शुचिर्भूतपणा

असा जो स्वकर्मी सदा लक्ष ठेवी ।
तयासीच सिद्धी मिळे ही प्रभावी ॥
तसा अर्जुना जो सदा दक्ष राही ।
तया सिद्धि लाभे कशी ऐक तीही ॥ ४५ ॥

जयापासुनी विश्व निर्माण झालें ।
जयाने पहा तें सदा व्यापियेलें ॥
स्वकर्मा-फुलानी तया पूजिताती ।
तया मोक्ष सिद्धी मिळे ही प्रचीती ॥ ४६ ॥

स्वधर्मी जरी गौण भासे स्वकर्म ।
परावा दिसे तो जरी गोड धर्म ॥
परी आपला धर्म जो थोर मानी ।
तसा आचरी तो करी पापहानी ॥ ४७ ॥

स्वकर्मी जरी दोष आभास होई ।
तरी त्याग तो योग्य नाही कधीही ॥
रहातो जसा धूर अग्नीत जाण ।
तसा दोष कर्मामधे ये दिसून ॥ ४८ ॥

अनासक्त ही बुद्धि सर्वत्र राखी ।
निरिच्छे सदा जो मनासीहि जिंकी ॥
असा योग संन्यास साधूनिया तो ।
महासिद्धि नैष्कर्म्यता मेळवीतो ॥ ४९ ॥

मिळाल्यावरी सिद्धि ही पार्थराया ।
पुढे थोरली ज्ञाननिष्ठा कळाया ॥
तसे ब्रह्म तेंही कसें प्राप्त होई ।
तुला सांगतो नीट जाणून घेई ॥ ५० ॥

पुरी बुद्धि सात्त्वीक ही साधुनीया ।
मनासीहि धैर्ये पुरे रोधुनीया ॥
तसे वीषयासीहि टाकी पुरे तो ।
तशी द्वेष प्रीतीहि सोडून देतो ॥ ५१ ॥

सदा जाण एकांतवासात बुद्धी ।
तनूसी मनासी नि वाचेसि साधी ॥
सदा जो मिताहारि नी ध्यानधारी ।
तसेचीहि वैराग्य जो अंगिकारी ॥ ५२ ॥

अहंकार नी गर्व तैसे बलासी ।
तसा काम नी क्रोध लोभादिकासी ॥
असे सर्व सोडून जो शांत राही ।
परा सिद्धिला तो पुरा योग्य होई ॥ ५३ ॥

असा ब्रह्मभूती प्रसन्ने रहातो ।
तसा काम नी शोक सोडून देतो ॥
समानत्व बुद्धी सदा ठेवुनीया ।
परा भक्ति साधी सख्या पार्थराया ॥ ५४ ॥

अशा भक्तियोगेच मी कोण आहे ।
प्रभावास माझ्या खरें जाणताहे ॥
यथार्थत्वतेने पुरें जाणुनीया ।
मला मेळवितो सख्या पार्थराया ॥ ५५ ॥

असा भक्त माझा अनन्येच राही ।
सदा नित्य कर्मेंहि सारी करीही ॥
म्हणूनीच माझ्या प्रसादे पहा तो ।
परधाम माझें सख्या मेळवीतो ॥ ५६ ॥

मने सर्व कर्मे मला अर्पुनीया ।
अनन्यें रहावें मला चिंतुनीया ॥
समानत्व बुद्धी सदाची धरावी ।
सदोदीत हें चित्त माझ्यात ठेवी ॥ ५७ ॥

असें चित्त माझ्यात तू ठेवशील ।
तरी मत्प्रसादे भये नासतील ॥
परी नायकीशी जरी मीपणाने ।
तरी पावसी नाश तू निश्चयाने[1] ॥ ५८ ॥

धरूनी अहंकार तू बैसशील ।
जरी युद्ध टाळू असे इच्छिशील ॥
तरी तीहि इच्छा मुळी व्यर्थ जाई ।
तुझी प्रकृती गोवि युद्धा तुलाही ॥ ५९ ॥

---

१ परमार्थापासून भ्रष्ट होशील

स्वभावा धरूनीच कर्मे कराया ।
पुरा बद्ध आहेस तू पार्थराया ॥
जरी ना करावें असे इच्छिशील ।
तरी मोहपाशे करू लागशील ॥ ६० ॥

पहा सर्व भूतान्तरी तो बसूनी ।
प्रभू या शरीरास मायेकडूनी ॥
जिवाच्याच कर्मानुसारे सदा तो ।
जणू काय यंत्रापरी फीरवीतो ॥ ६१ ॥

तयालाच तू सर्व भावे भजावें ।
अनन्ये सदा भक्तिभावे रहावें ॥
तरी थोर शांती प्रभूच्या कृपेने ।
परंधाम माझें मिळें निश्चयाने ॥ ६२ ॥

असें गुह्य हें ज्ञान गुह्यातुनी या ।
तुला बोलिलो मी सख्या पार्थराया ॥
तरी पूर्ण ध्यानात घेऊनि सारें ।
त्वदिच्छे प्रमाणे करी पांडवा रे ॥ ६३ ॥

पहा सर्व गुह्यात हें गुह्यज्ञान ।
पुन्हा सांगतो तेंच घे आयकून ॥
अती प्रीय आहेस माझा म्हणूनी ।
तुला सांगतो तें हिताचेंच मानी ॥ ६४ ॥

मनालागि माझ्या ठिकाणीच ठेवी ।
तशी भक्ति माझीच तू आचरावी ॥
तरी पावसी सत्य माझ्या पदासी ।
मला प्रीय आहेस तू पुण्यराशी ॥ ६५ ॥
सख्या सर्व धर्मासि[१] सोडून देई ।
मला तू सदाही अनन्येच राही ॥
करी मी तुला मुक्त पापातुनी या ।
तरी सर्व दुःखास दे सोडुनीया ॥ ६६ ॥
तपोहीन आणीक जो भक्तिहीन ।
तसा मत्सरी आणि नींदीहि जाण ॥
कधी ऐकण्याचीहि इच्छा करीना ।
तरी ज्ञान सांगू नको हें तयांना ॥ ६७ ॥
सख्या ज्ञान माझें अती श्रेष्ठ आहे ।
खऱ्या भक्तिवानास जो ऐकवी हें ॥
तरी तोहि माझी करी भक्ति जाण ।
तसा तोहि घे मत्पदा मेळवून ॥ ६८ ॥
सख्या याहुनी प्रीय माझा असेना ।
दुजा तो कुणीही कुठेही दिसेना ॥
म्हणूनी मलाही तया वाचुनीया ।
कुणी आवडेना दुजा पार्थराया ॥ ६९ ॥

---

१ मोक्षप्राप्तीच्या अन्य साधनास

असा आमचा धर्मसंवाद झाला ।
तयाचा जयांनीहि अभ्यास केला ॥
तरी ज्ञानयज्ञे मला पूजियेलें ।
परी भक्ति ती मी असें मानियेलें ॥ ७० ॥

मनापासुनी शुद्ध भक्ती धरूनी ।
असा कोण जो हेंचि ऐकेल कानी ॥
तरी पुण्यलोकाप्रती तोहि जाई ।
तसा सर्व पापातुनी मुक्त होई ॥ ७१ ॥

सख्या सर्व हें एकचित्ते करूनी ।
पुरें ऐकुनी घेतलें ना मनानी ॥
तरी भ्रांतलेला तुझा मोह आता ।
पुरेपूर गेलाच ना सांग पार्था ॥ ७२ ॥

अर्जुन म्हणाला

तुझीया प्रसादे पुरा मोह गेला ।
स्मृती पूर्ण झाली मला ती दयाळा ॥
मनातील शंकाहि गेल्या फिटून ।
तवाज्ञेप्रमाणेच वागेन जाण ॥ ७३ ॥

संजय म्हणाला

असा तो प्रभू श्रीहृषीकेश थोर ।
तसाची महात्माहि तो पार्थवीर ॥

तयांचा अती श्रेष्ठ संवाद झाला ।
तसा तोहि अद्‌भूत मी ऐकियेला ॥ ७४ ॥

जधी श्रेष्ठ योगेश श्रीकृष्ण देवे ।
तसे सांगता पांडवासी स्वभावे ॥
अती थोर तें गुह्य मी ऐकियेलें ।
गुरूंच्या कृपेने मला तें मिळालें ॥ ७५ ॥

हृषीकेष अर्जून संवाद जाण ।
अती शुद्ध अद्‌भूत भारी म्हणून ॥
स्मरूनी स्मरूनी पुन्हा ते पुन्हा ते ।
अती हर्ष होतो पहा या मनाते ॥ ७६ ॥

सर्वोत्तमा त्या अशा कृष्णरूपा ।
तसेचीहि अद्‌भूत त्या विश्वरूपा ॥
बघूनीच आश्चर्यही वाटताहे ।
अती हर्षही तो पुन्हा होत आहे ॥ ७७ ॥

जिथे योग योगेश श्रीकृष्ण देव ।
जिथे पार्थही थोर ज्याचा प्रभाव ॥
तिथेची जयश्री तिथेचीहि नीती ।
तिथेची असे न्याय ऐश्वर्य वस्ती ॥ ७८ ॥

* * *

स्वकर्मेचि पार्था सदा आचरावी ।
फलाशा नि आसक्ति काही न ठेवी ॥
असे आठरा येथ अध्याय झाले ।
विनम्रे तसे विष्णुपुत्रे कथीले ॥

१५६३ काव्य
ग्रंथ संग्रहालय ठाणे
9340
REFBK-0013508